- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,२८,३७० /-
✔ २२ कॅरेट : १,११,५५० /-
✔ चांदी : १,५८,७९०/-

दैनिक
सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर • संचालक-संपादक : अजय बिवडे

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 Mail Id : sinhvanivrutta@gmail.com दिनांक : शुक्रवार, २७ नोव्हेंबर २०२६ Epaper : epaper.sinhvani.com पृष्ठे : ८ | वर्ष : १ | अंक : ३४७ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

राज्यातील ७ कोटी फ्लॅटधारकांना मिळणार 'व्हर्टिकल प्रॉपर्टी कार्ड'

- फडणवीस सरकारचा ऐतिहासिक निर्णय, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची घोषणा
- फ्लॅटधारकांचा आता इमारतीतील मोकळ्या जागेवरही अधिकार
- हरकती, सूचना नोंदण्यासाठी नियमावलीचा मसुदा ३० दिवस संकेतस्थळावर



दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई

फडणवीस सरकारने राज्यातील फ्लॅटधारकांच्या हक्कासाठी आज एक ऐतिहासिक निर्णय जाहीर केला. जमिनीच्या 'सातबारा'च्या धर्तीवर स्वतंत्र ओळख व फ्लॅटधारकांना कायदेशीर हक्क देणारे 'व्हर्टिकल प्रॉपर्टी कार्ड' देण्याची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. यामुळे राज्यातील अंदाजे ७ कोटी सदनिकाधारकांना दिलासा मिळणार आहे.

या नियमावलीचा मसुदा (ड्राफ्ट) आज महसूल विभागाच्या शासकीय संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला असून, त्यावर ३० दिवस नागरिक व तज्ज्ञांकडून सूचना आणि हरकती मागवण्यात येणार आहेत. त्यानंतर पुढील दोन महिन्यांत नियमावली अंतिम करून ही योजना राज्यभर लागू केली जाईल, असे अशी माहिती महसूलमंत्री बावनकुळे यांनी पत्रकारांना दिली. यावेळी महसूल राज्यमंत्री योगेश कदम उपस्थित होते.

ग्रामीण भागात जसा जमिनीसाठी सातबारा आणि शहरी भागात मिळकत पत्रिका असते, तशी स्वतंत्र ओळख व मालकी हक्काचा ठोस अभिलेख फ्लॅटधारकांकडे नव्हता. ही पोकळी भरून काढण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील नियमांमध्ये सुधारणा करण्यात येत आहे.

D1 आणि D2 नमुन्यांत स्वतंत्र नोंदी

नव्या रचनेनुसार, नागरी भागातील इमारतींसाठी D1 आणि D2 असे नमुने निश्चित करण्यात आले आहेत.

D1 नमुना : मूळ मालक, जमीन, मंजूर बांधकाम आराखडा, खुली जागा, रस्ते आणि सामाईक क्षेत्राचा सर्वसमावेशक मुख्य अभिलेख यामध्ये राहील. सामाईक जागेवर सर्वांचा हक्क नोंदवला जाईल.

D2 नमुना : प्रत्येक फ्लॅटधारकाचे नाव, सदनीका क्रमांक, मंजूर क्षेत्रफळ आणि संबंधित हक्कांची स्वतंत्र नोंद यामध्ये असेल.

ग्रामीण भाग : ग्रामीण भागातील इमारतींसाठी IA - गाव नमुना ७ क आणि IB गाव नमुना ७ ड अशा स्वरूपात अभिलेख तयार केले जातील.

डिजिटल कार्ड आणि सर्व विभागांचे एकत्रिकरण

संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन राबवली जाणार असून, मंजुरीनंतर फ्लॅटधारकांना एटीएम कार्डप्रमाणे खिशात ठेवता येईल असे डिजिटल प्रॉपर्टी कार्ड मिळेल. यासाठी नोंदणी व मुद्रांक विभाग, सहकार विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, नियोजन प्राधिकरणे (सिडको, नैना, महापालिका, नगरपालिका), महारेरा आणि भूमी अभिलेख विभागांचे API माध्यमातून एकत्रीकरण केले जाणार आहे. इमारतीचा पुनर्विकास झाल्यास जुन्या नोंदी बंद करून नवीन आराखड्यानुसार अद्ययावत नोंदी केल्या जातील.

बोजे, कर्ज आणि व्यवहार सुलभ होणार

फ्लॅटवर बँकेचे कर्ज, गहाणखत, मालमत्ता कर किंवा सोसायटीची थकबाकी, न्यायालयीन निर्बंध अथवा शासकीय देणी असल्यास त्याची थेट नोंद संबंधित प्रॉपर्टी कार्डवर होईल. बिल्डरचे कॉमन कर्ज मुख्य नोंदीवर तर वैयक्तिक कर्ज संबंधित सदनीकाधारकाच्या कार्डवर दिसेल. अधिकृत बांधकाम, मंजूर नकाशा आणि संबंधित कागदपत्रे असलेल्या प्रकल्पांनाच हे कार्ड मिळणार असून, अनधिकृत बांधकामांना यातून वगळण्यात आले आहे.

पुनर्विकास आणि कन्व्हेयन्सबाबत स्पष्टीकरण

कन्व्हेयन्स आणि पुनर्विकासाच्या प्रश्नावर बोलताना महसूलमंत्र्यांनी स्पष्ट केले की, डीम कन्व्हेयन्सची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी महसूल, नगरविकास आणि सहकार विभागाची कार्यपद्धती तयार करण्यात येत आहे. तसेच, या मसुद्याचा अभ्यास करून नागरिकांनी आणि माध्यमांनी जास्तीत जास्त सूचना द्याव्यात, जेणेकरून नियमावली अधिक अचूक तयार करता येईल, असे आवाहनही महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

थोडक्यात

नालीत पडून चिमुकलीचा मृत्यू

पाण्याच्या टाक्यात पडून तरूण ठार

चंद्रपूर : घरासमोरील उघड्या पाण्याच्या टाक्यात पडून २६ वर्षीय तरुणाचा, तर उघड्या नालीत पडून दीड वर्षाच्या चिमुकलीचा मृत्यू झाल्याच्या दोन हृदयद्रावक घटना चंद्रपूर जिल्ह्यात घडल्या. या दुर्घटनांमुळे करंजी आणि नवेगाव परिसरात शोककळा पसरली असून, उघड्या टाक्या आणि नाल्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

करंजी येथील सागर अनिल गुरमेट्टीवार (२६) हे कोनसरी येथील लाईन्स मेटल कंपनीत कार्यरत होते. बुधवारी (२५ नोव्हेंबर) रात्री ११ वाजता कामावरून घरी परतल्यानंतर लघुशंकेसाठी ते घराबाहेर पडले. यावेळी अंधारात अंदाज न आल्याने त्यांचा तोल जाऊन घरासमोरील सुमारे पाच फूट खोल जुन्या नळाच्या उघड्या टाक्यात ते पडले. डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. गुरुवारी सकाळी ही घटना उघडकीस आली. नव्या संसाराची स्वप्ने पाहणाऱ्या सागर यांच्या निधनाने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. दरम्यान, राजुरा तालुक्यातील भेंडाळा गट ग्रामपंचायतीअंतर्गत नवेगाव येथे गुरुवारी (२६ नोव्हेंबर) सकाळी भूमिका भोपाल पेंदोर या दीड वर्षाच्या चिमुकलीचा उघड्या नालीत पडून मृत्यू झाला. वडील शेतात गेले असताना आई घरात असताना खेळता खेळता भूमिका नालीत पडली. कुटुंबीयांनी तिला तातडीने राजुरा ग्रामीण रुग्णालयात नेले; डॉक्टरांनी मृत घोषित केले.

तब्बल १२१ किलो सोने तिरुपती बालाजी चरणी दान



वृत्तसंस्था, मुंबई

देशभरातील भाविकांचं श्रद्धास्थान असलेल्या तिरुपती बालाजी मंदिरात भाविकांची मोठी गर्दी असते. विशेष म्हणजे, येथील दानपेटीत किंवा बालाजीचरणी देखील भाविक मोठं दान करतात. सोनं-चांदी, हिरे, यांसह मौल्यवान वस्तूंची भेट तिरुपती बालाजीला दिली जाते. आता, चक्क १६० कोटी रुपयांचं सोनं एका भक्ताने तिरुपती बालाजी मंदिरात अर्पण केल्याची माहिती आहे. या भाविकाच्या दानशूरपणावर सगळेच आश्चर्यचकित झाले आहेत.

तिरुपती बालाजी मंदिरात भाविक सोन्याची नाणी, मौल्यवान वस्तू यांच्यासह विविध भेटवस्तू किंवा दान अर्पण केले जाते. काही भाविक आपलं श्रद्धास्थान असलेल्या या मंदिरात किलो-किलो सोनं किंवा चांदीही दान करतात. त्यामुळेच, देशभरातील श्रीमंत देवस्थान म्हणूनही या मंदिराकडे पाहिले जाते. आता, चेन्नईतील एका व्यापाऱ्याने तब्बल १२१ किलो सोनं तिरुपती चरणी अर्पण केलं आहे. या सोन्याची बाजारभावानुसार किंमत १६० कोटी रुपये एवढी आहे. तिरुपती बालाजी चरणी तब्बल १२१ किलो सोनं दान करणाऱ्या उद्योगपतीचं नाव वर्धमान जैन असून त्यांनी हेल्थकेअर टेक्नॉलॉजी, बिझनेस प्रोसेस आउटसोर्सिंग आणि ऑटोमेशन क्षेत्रात आपले उद्योग उभारले आहेत.

पॅकेटबंद खाद्यपदार्थांवर 'हाय फॅट, शुगर, सॉल्ट'चा इशारा देणारा षटकोन छापा

सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

पॅकेटबंद खाद्यपदार्थांमध्ये मीठ, साखर आणि सॅचुरेटेड फॅटचे प्रमाण अधिक असल्यास आता ग्राहकांना पॅकेटवरच धोक्याचा इशारा देणारे लेबल दिसणार आहे. सर्वोच्च न्यायालयानं भारतीय खाद्य सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाला याबाबत नवीन मार्गदर्शक तत्त्वं आणि नियम तयार करण्याचे आदेश दिले आहेत.

केवळ वरुन मिसळलेली साखर किंवा फॅट नव्हे, तर खाद्यपदार्थात असलेली एकूण साखर आणि सॅचुरेटेड फॅट यालाच इशाऱ्याचा निकष मानण्यात यावे, असं न्यायालयानं स्पष्ट केलं.

न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठानं सांगितलं की, मीठ, एकूण साखर आणि सॅचुरेटेड फॅटची कमाल मर्यादा नव्याने निश्चित केली जावी. इशाऱ्यासाठी ठरवलेली मर्यादा इतकी कमी नसावी की प्रत्येक पॅकेटवरच इशारा छापावा लागेल आणि इतकीही जास्त नसावी की आरोग्याला हानी पोहोचवणारे प्रमाण त्यातून सुटून जाईल.

सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्देशांनुसार, खाद्यपदार्थाच्या पॅकेटच्या मुख्य दर्शनी भागावर ३ स्वतंत्र षटकोन तयार करावेत. त्यामध्ये अनुक्रमे High Fat, High Sugar आणि High Salt असे स्पष्टपणे लिहिले जावे.

प्रत्येक षटकोन पॅकेटच्या मुख्य क्षेत्राच्या किमान ४ ते ५ टक्के जागा व्यापेल, याची काळजी घ्यावी. या षटकोनांमध्ये लिहिलेल्या शब्दांचा फॉन्ट इतका मोठा आणि स्पष्ट असावा की सर्वसामान्य ग्राहकांना तो सहज वाचता येईल.मुले आणि सर्वसामान्य नागरिकांना पॅकेटबंद खाद्यपदार्थांतील पोषक घटक आणि त्यांच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामांबाबत जागरूक करणं अत्यंत गरजेचं असल्याचं खंडपीठानं अधोरेखित केलं. या निर्देशांच्या आधारे FSSAI ने मसुदा नियम तयार करावेत आणि संबंधित घटकांकडून सूचना व हरकती मागवाव्यात, असं कोर्टाने सांगितलं.

तसेच हे नियम लवकरात लवकर अंतिम करून अधिसूचित करावेत, असंही स्पष्ट केलं आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी १० आठवड्यांनंतर होणार असून, मसुदा नियम तयार झाले आहेत की नाही, याची माहिती कोर्ट त्यावेळी घेईल.

३० नोव्हेंबर रोजी लोकसभा, तर २ डिसेंबरला राज्यसभेचे अधिवेशन

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

केंद्र सरकारने लोकसभा अध्यक्ष आणि राज्यसभेच्या सभापतींना संसदेच्या दोन्ही सभागृहांची बैठक पुन्हा बोलवण्याची विनंती केली आहे. या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यास लोकसभेचे कामकाज ३० नोव्हेंबर २०२६ पासून आणि राज्यसभेचे कामकाज २ डिसेंबरपासून सुरू होणार आहे. तर ३ डिसेंबर रोजी दोन्ही सभागृहांची कार्यवाही समाप्त होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत स्पष्ट केले की, हे कामकाज संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या कार्यवाहीचाच एक भाग असेल. मात्र, हा कार्यक्रम सभागृहाच्या कामकाजाच्या गरजांवर अवलंबून राहणार आहे. या घोषणेनंतर काँग्रेसने आगामी संसदीय बैठकीसाठी आपली रणनीती ठरवण्यासाठी शुक्रवारी सायंकाळी ४.३० वाजता दिल्लीत संसदीय समितीची बैठक बोलावली आहे. या बैठकीत संभाव्य अधिवेशनासंदर्भात पक्षाची भूमिका आणि तयारीवर सखोल चर्चा केली जाणार आहे.संसदेची ही प्रस्तावित बैठक अशा वेळी होत आहे, जेव्हा सरकारच्या मतदारसंघ पुनर्रचना विधेयकावर आणि महिला आरक्षण लागू करण्यावरून जोरदार चर्चा आणि वाद सुरू आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीतही या विषयावर चर्चा झाली असून, पंतप्रधानांनी मंत्र्यांना आगामी संसदीय बैठकीसाठी सज्ज राहण्याच्या सूचना दिल्याचे समजते.



महिला आरक्षणाला निवडणूक मतदारसंघांच्या पुनर्रचनेशी जोडणारे संविधान दुरुस्ती विधेयक वंदा १७ एप्रिल रोजी झालेल्या विशेष सत्रात लोकसभेत मंजूर होऊ शकले नव्हते. त्यावेळी या विधेयकाला आवश्यक असलेले दोन-तृतीयांश बहुमत मिळू शकले नव्हते. हे विधेयक मंजूर न झाल्यापासूनच देशात मतदारसंघ पुनर्रचना प्रक्रियेबाबत आणि लोकसभेच्या जागा वाढवण्याबाबत चर्चा तीव्र झाली आहे.मतदारसंघ पुनर्रचनेवरून सुरू असलेल्या चर्चेत असा एक संभाव्य प्रस्तावही पुढे आला आहे की, राज्यांमध्ये १९७१ च्या जनगणनेच्या आधारे सध्याच्या जागांचा हिस्सा कायम ठेवत लोकसभेच्या एकूण जागांमध्ये ५० टक्क्यांपर्यंत वाढ करण्यात यावी. दुसरीकडे, हे कामकाज सुरू होत असतानाच विविध मुद्द्यांवरून विरोधी पक्षांच्या चिंताही समोर येत आहेत. विशेषतः एसआयआरच्या मुद्द्यावरून विरोधी पक्षांकडून संसदेत चर्चेची मागणी केली जाण्याची दाट शक्यता आहे.



संपादकीय लेखणीतून...

भारतीय संविधान

दरवर्षी २६ नोव्हेंबर रोजी भारतात साजरा केला जातो. सन १९४९ साली याच दिवशी भारतीय संविधान सभा यांनी भारताच्या संविधानाला अंतिम स्वरूप दिले. दि. २६ जानेवारी १९५० रोजी संविधान अंमलात आले, ज्यामुळे भारत सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही प्रजासत्ताक देश म्हणून ओळखला गेला. भारतीय संविधान हे जगातील सर्वात मोठे लिखित संविधान असून विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना संविधानाचे शिल्पकार मानले जाते. संविधानाने भारतातील प्रत्येक नागरिकाला समानता, स्वातंत्र्य, न्याय, आणि बंधुता या मुलभूत हक्कांची हमी दिली आहे. या दिवशी शाळा, महाविद्यालये, आणि सरकारी कार्यालयांमध्ये संविधान वाचन, चर्चासत्रे आणि विविध उपक्रम आयोजित केले जातात. संविधानाने दिलेल्या हक्कांसोबतच आपल्यावर असलेल्या कर्तव्यांची आठवण करून दिली जाते.

संविधान दिन आपल्याला आपल्या लोकशाही मूल्यांचा आदर करण्याची प्रेरणा देतो आणि देशाच्या प्रगतीसाठी संविधानाच्या तत्वांनुसार कार्य करण्याचे स्मरण करून देतो. "संविधान दिन" किंवा "राष्ट्रीय विधी दिन" हा २६ नोव्हेंबर रोजी भारतभर साजरा केला जातो. दि. २९ ऑगस्ट १९४७ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय संविधानाच्या निर्मितीसाठी मसूदा समिती स्थापन झाली. अनेक बैठका व चर्चासत्रांनतर या समितीने सादर केलेला अंतिम मसुदा दि. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेने स्वीकारला. त्यामुळे २६ नोव्हेंबर हा दिवस "भारतीय संविधान दिन" म्हणून साजरा केला जातो. राज्यघटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी "भारताचे संविधान" संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांना सुपूर्द केले. भारतीय संविधानाचे शिल्पकार आणि घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सन्मानार्थ भारतीय संविधान दिन साजरा केला जातो. भारत सरकारने डॉ.आंबेडकरांचे १२५ वे जयंती वर्ष साजरे केले जात असताना त्यांना एक प्रकारची श्रद्धांजली वाहण्यासाठी दि. २६ नोव्हेंबर २०१५ रोजी पहिला अधिकृत संविधान दिन साजरा केला. संविधानाबाबत जनजागृती करण्यासाठी आणि आंबेडकरांच्या विचारांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने देशभरात २६ नोव्हेंबर हा दिवस "संविधान दिन" म्हणून साजरा केला जातो. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने २४ नोव्हेंबर २००८ ला आदेश काढून" २६ नोव्हेंबर" हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा करण्याचे घोषित केले होते. दरवर्षी २६ नोव्हेंबर रोजी भारतभर संविधान दिन साजरा केला जातो. दि. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय संविधान सभेने संविधानाचा स्वीकार केला, त्याचे स्मरण म्हणून हा दिवस पाळला जातो.

संविधान दि. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी स्वीकारले गेले आणि दि. २६ जानेवारी १९५० रोजी ते अंमलात आले. संविधान तयार करण्यासाठी २ वर्षे, ११ महिने आणि १८ दिवस इतका कालावधी लागला. मसुदा समिती: दि. २९ ऑगस्ट १९४७ रोजी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली मसुदा समिती स्थापन झाली. सुरुवात: डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षात भारत सरकारने २०१५ पासून दरवर्षी २६ नोव्हेंबर रोजी "संविधान दिन" साजरा करण्याचा निर्णय घेतला.

नागरिकांमध्ये घटनात्मक मूल्यांबद्दल आणि लोकशाही तत्त्वांबद्दल जागरूकता निर्माण करणे हा यामागचा उद्देश आहे. शाळा, महाविद्यालये आणि शासकीय कार्यालयांमध्ये संविधानाचे वाचन, भाषण आणि विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. २६ नोव्हेंबर १९४९ मध्ये भारतीय संविधान सभेने भारताची राज्यघटना स्विकारली. त्यामुळे २६ नोव्हेंबर हा दिवस 'भारतीय संविधान दिन' म्हणून साजरा केला जाते. परंतु, संविधान सभेने ही राज्यघटना स्विकारल्यानंतर देशात त्याची अमंलबजावणी होण्यास काही महिने लागले. दि. २६ जानेवारी १९५० रोजी ही राज्यघटना पूर्णपणे लागू करण्यात आली. त्यामुळे, हा दिवस प्रजासत्ताक दिन म्हणून देशभरात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. संविधान दिवस साजरा करण्याची परंपरा खरं तर सन २०१५ पासून सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे खरं तर तेव्हापासूनच हा दिवस आपल्या भारतात दरवर्षी "संविधान दिन" म्हणून साजरा केला जाते. भारतीय राज्यघटनेत अनेक महत्वपूर्ण तत्त्वे आहेत, ज्यांच्या आधारे देशातील सरकार आणि नागरिकांसाठी मूलभूत, राजकीय तत्त्वे, कार्यपद्धती, अधिकार, मार्गदर्शक तत्त्वे, कायदे इत्यादी ठरवण्यात आले आहेत. आपल्या देशाच्या संविधानाच्या निर्मितीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सर्वात महत्त्वाचा वाटा होता. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आणि निमति डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहण्यासाठी आणि आदरांजली वाहण्याचे प्रतीक म्हणूनही हा "भारतीय संविधान" दिन साजरा केला जातो.

तिरुपरनकुंद्रमचा दीपवाद आणि तामिळनाडूच्या भक्तीची अखंड ज्योत

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

तामिळनाडूच्या धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनात दिवाळीइतकेच अढळ स्थान असलेल्या कार्तिगई दीपम महोत्सवाला यंदा मदुराई जिल्ह्यातील ऐतिहासिक तिरुपरनकुंद्रम टेकडीवरील वादामुळे गंभीर कायदेशीर आणि राजकीय वळण मिळाले. तिरुपरनकुंद्रम टेकडी ही धार्मिकदृष्ट्या अत्यंत संवेदनशील आणि बहुआयामी मानली जाते; कारण टेकडीच्या पायथ्याशी भगवान मुरुगन यांच्या सहा प्रमुख निवासस्थानांपैकी एक असलेले प्रसिद्ध अरुळमिगू सुब्रमण्य स्वामी मंदिर आहे, टेकडीवर उची पिल्लैयार मंदिर अर्थात दीपमंडपम आहे, तर टेकडीच्या माथ्यावर हजरत सुलतान सिकंदर बादशहा औलिया दर्गा स्थित आहे. दरवर्षी कार्तिगई दीपमचा मुख्य महादीप पारंपरिकपणे उची पिल्लैयार मंदिराजवळील दीपमंडपम येथेच प्रज्वलित केला जातो. मात्र, काही हिंदू संघटना आणि याचिकाकर्त्यांनी दग्यापासून सुमारे ५० मीटर अंतरावर असलेल्या दीपथून या दगडी स्तंभावर दिवा लावण्याची मागणी केल्याने या वादाला तोंड फुटले. दुसरीकडे, दर्गा प्रशासन व काही स्थानिक संघटनांनी जागेच्या मालकी हक्काचा आणि सामाजिक संवेदनशीलतेचा मुद्दा उपस्थित करून याला तीव्र विरोध दर्शवला, तर तामिळनाडूच्या हिंदू धार्मिक व धमार्दाय विभागाने आपल्या अहवालात दीपथूनवर दिवा लावण्याची कोणतीही ऐतिहासिक परंपरा नसून तो एक ब्रिटिशकालीन सर्वेक्षण स्तंभ असल्याचे नमूद केले.

या संवेदनशील वादात न्यायालयीन हस्तक्षेप झाल्यामुळे संपूर्ण राज्याचे लक्ष प्रशासनाच्या भूमिकेकडे लागले होते. २० नोव्हेंबर २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती अरविंद कुमार आणि न्यायमूर्ती विपुल एम. पांचोली यांच्या खंडपीठाने केवळ यंदाच्या वषार्पुरती दीपथूनवर दिवा लावण्यास अंतरिम परवानगी दिली होती; परंतु या स्तंभाजवळ सर्वसामान्य भाविकांना जाण्यास, मिरवणुका काढण्यास किंवा घोषणाबाजी करण्यास स्वतः सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट मनाई करत केवळ मंदिर प्रशासन आणि सरकारी अधिकाऱ्यांच्या मर्यादित पथकाला तिथे जाण्याची मुभा दिली होती. प्रत्यक्षात उत्सवाच्या दिवशी, म्हणजेच २४ नोव्हेंबर २०२६ रोजी मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारच्या मदुराई जिल्हा प्रशासनाने संपूर्ण टेकडीचा परिसर अतिसंवेदनशील क्षेत्र म्हणून घोषित केला, कडक जमावबंदी लागू केली, ड्रोन उडवण्यावर बंदी घातली आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी ५,६०० हून अधिक पोलीस तैनात केले.

या कठोर निबंधांमुळे सामान्य भाविकांना गिरिवलम म्हणजेच प्रदक्षिणा आणि दर्शनासाठी मोठ्या अडचणी येत असल्याचा तक्रारी समोर येताच मद्रास उच्च न्यायालयानेही २४ नोव्हेंबर २०२६ रोजीच गंभीर चिंता व्यक्त केली आणि जिल्हाधिकाऱ्यांना प्रतिबंधांचा पुनर्विचार करण्याचे, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याचे तसेच ताब्यात घेतलेल्या नागरिकांना मुक्त करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.

राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशाविरुद्ध पुनर्विचार याचिका दाखल केली होती, परंतु २४ नोव्हेंबर २०२६ च्या सायंकाळपर्यंत त्यावर कोणतीही स्थगिती मिळू शकली नाही. असे असतानाही सायंकाळी सहा वाजता केवळ पारंपरिक उची पिल्लैयार मंडपम येथेच महादीप प्रज्वलित करण्यात आला आणि दीपथून स्तंभावर दिवा लावला गेला नाही. या घडामोडीनंतर टेकडीच्या पायथ्याशी जमलेल्या आंदोलकांची पोलिसांशी झटापट झाली आणि पोलिसांनी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष नैनार नागेंद्रन यांच्यासह हिंदू मुन्नानीच्या अनेक कार्यकर्त्यांना प्रतिबंधात्मक ताब्यात घेतले. या संपूर्ण घटनेवरून तामिळनाडूमध्ये तीव्र राजकीय आरोप-प्रत्यारोपांना उधाण आले आहे. सर्वोच्च न्यायालय आणि मद्रास उच्च न्यायालयाचे स्पष्ट आदेश असतानाही राज्य सरकारने ते धुडकावून लावले आणि कडक जमावबंदीच्या आडून भाविकांच्या धार्मिक अधिकारांवर गदा आणली, असा गंभीर आरोप भाजपा आणि हिंदू संघटनांनी केला आहे. याउलट, दग्यांजवळ दिवा लावल्याने सामाजिक सलोखा बिघडण्याचा धोका होता आणि पारंपरिक जागेवरच दिवा लावणे योग्य आहे, अशी ठाम भूमिका राज्य सरकारने मांडली असून मुख्यमंत्री विजय यांच्या तमिळगा वेत्री कळगम सरकारला पाठिंबा देणाऱ्या डावे पक्ष, विदुथलाई चिरुथैगल कच्ची आणि काँग्रेस यांनीही प्रशासनाच्या या निर्णयाचे पूर्ण समर्थन केले आहे.

तिरुपरनकुंद्रम टेकडीच्या माथ्यावरील या कायदेशीर तणावाची आणि कडक पोलीस बंदोबस्ताची झळ मात्र सामान्य भाविकांच्या अढळ श्रद्धेला किंवा तामिळनाडूतील मुख्य धार्मिक विधींना बसली नाही; उलट संपूर्ण राज्यात कार्तिगई दीपम महोत्सव यंदाही प्रचंड भक्तिभावाने आणि पारंपरिक थाटात पार पडला. खुद्द तिरुपरनकुंद्रमच्या पायथ्याशी असलेल्या अरुळमिगू सुब्रमण्य स्वामी मंदिरात उत्सवाचे सर्व पारंपरिक विधी अखंडपणे पार पडले, मंदिराच्या आवारात हजारो पणत्यांची आरास करण्यात आली आणि सायंकाळी सहा वाजता महादीप प्रज्वलनानंतर मंदिराबाहेर ताडाच्या सुक्या पानांचा उंच असूवा यांची पूर्तता करत असू तर समाजात आणि देशात आराजकता, दहशत, वाद, तंटे, भांडण, भेदभाव कधीच तोंड बाहेर काढणार नाही.

परिणामी समाज, सामाजिक स्थिती, सामाजिक बांधिलकी, सामाजिकता, प्रेम टिकून राहिल. हा मानूस जन्म. जो कि आपल्याला ईश्वराने दिला आहे. त्या ईश्वराने आपल्या अंगात रक्त एकाच रंगाचं दिलं आहे. ना कि वेगळं. ईश्वराने हिच सामानता मानव जातीला प्रदान केली आहे. जी कि आपल्याला टिकवून ठेवायची आहे. त्या सामानतेत कोणतेही बदल, भेदभाव न करता. मानवीधर्म जपून ठेवायचा आहे. घरातील, समाजातील वयाने मोठे असलेले माणसं त्यांच्यापेक्षा लहानांना चांगल्याच गोष्टी सांगितल्या वा शिकविल्या पाहिजेत. कारण, लहान मुलं मोठ्यांच्या गोष्टींचे अनुकरण करीत असतात. म्हणून लहानांना चांगल्या गोष्टींची जाण लहान वयातच करून दिली पाहिजे. जेणेकरून ती मोठी झाल्यावर समाजभान व समाजमन राखत एकमेकांवर निःस्वार्थ प्रेम करत चांगल्या आणि भेदभाव विरहित समाजाची निर्मिती करतील. हे लोक असे ते लोक तसे अशा गोष्टी लहान मुलांना न शिकवता, त्यांच्या छोट्या कानी वाईट गोष्टी न भरवता आपण सारे एक आहोत. "आपण सर्व ईश्वराची लेकरं आहोत" ही शिकवण आत्तापासून त्यांच्या हृदयात रुजविणे महत्वाचे आहे.

- ९९६००२८८९९
देगलूर

तामिळनाडूतील या वादाने केवळ धार्मिक भावनांनाच नव्हे, तर केंद्र-राज्य संबंधांनाही एक नवा पैलू दिला आहे. तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी केंद्र सरकारवर राज्याच्या अधिकारांवर अतिक्रमण करण्याचा आरोप केला आहे. तर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी तामिळनाडू सरकारवर हिंदू सणांवर निर्बंध लादल्याचा आरोप केला आहे. या पार्श्वभूमीवर, तिरुपरनकुंद्रमचा हा प्रसंग बहुधार्मिक समाजात परंपरा, धार्मिक श्रद्धा, न्यायालयीन अधिकार आणि कायदा-सुव्यवस्था यांच्यातील नाजूक समतोलाची परीक्षा पाहणारा ठरला असून, राजकीय वादाच्या पलीकडे जाऊन तामिळ जनमानसात रुजलेल्या सांस्कृतिक ऐक्याची आणि भक्तीची ताकद या वर्षीच्या भव्य दीपमहोत्सवाने पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे.

- ९५६१५१४३०६

उपरवालेने फरक नहीं किया तो फरक करनेवाले हम कौन होते हैं?...

मनीषा विशाल सोन्नेकर/ सोनकांबळे

"क्रांतीवीर" पिक्चर मधील नाना पाटेकरांचा हा डायलॉग समस्त मानव जातीसाठी एक शिकवण ठरला आहे. "बोल बेटे, तेरे माँ को किसने मारा?. हिंदूओने मारा हैं ना". तेव्हा छोटा मुलगा म्हणतो "हां हिंदुओने मारा है". तेव्हा नाना पाटेकर त्या चाचाला मोठ्या आवाजात बोलत आधी स्वतःच्या बोटावर दगडाने मारून घेतात आणि नंतर त्या चाचाच्या बोटावर दगडाने मारतात. आणि म्हणतात कि, "अब पेहचानो, इसमे हिंदू का कोनसा खून हैं और मुसलमान का कोनसा खून हैं?.

अरे, ऊस भगवान ने हम इन्सानोंको बनाते समय किसी बात का फरक या भेदभाव नहीं किया. तो हम लोग कौन होते हैं?. एक दुसरेमे फरक या भेदभाव करनेवाले?".

खरंच, ईश्वराने माणूस बनवताना कोणताही, कसलाही फरक किंवा भेदभाव केला नाही. तर आपण भेदभाव करणारे कोण?. आपण ज्या



समाजात राहतो. त्या समाजाचं आपण सर्वजण कांही देणं लागतो आणि ते देणं म्हणजेच प्रेम, दया, बंधुता, आपुलकी इ. या गोष्टी जर आपण प्रत्येकजण निःस्वार्थ पणे एकमेकांना देत

खाईस्टचर्च कसोटीसाठी संघ निवडताना गौतमचा हट्टीपणा कायम राहणार की संघहिताचा निर्णय घेणार?

वेलिंग्टनमधील अनिर्णित लढतीतून धडा घेणार की पुन्हा त्याच चुका करणार? प्रशिक्षकाच्या प्रतिष्ठेपेक्षा भारतीय संघाचे हित महत्त्वाचे नाही का?

भाग-१

डॉ. दत्ता विघावे
क्रिकेट समीक्षक

भारतीय क्रिकेट संघाच्या न्यूझीलंड दौऱ्यातील दुसऱ्या आणि अखेरच्या कसोटी सामन्याची रंगभूमी आता खाईस्टचर्च येथे सज्ज झाली आहे. मात्र या सामन्यापूर्वी भारतीय संघासमोर केवळ न्यूझीलंडच्या वेगवान गोलंदाजीचे आव्हान नाही, तर स्वतःच्या संघनिवडीतील त्रुटी दुरुस्त करण्याचेही मोठे आव्हान आहे. वेलिंग्टन कसोटी अनिर्णित राहिली, पण त्या सामन्यात भारतीय संघाने कोणत्या चुका केल्या, कोणत्या खेळाडूंना संधी देण्याबाबत पुनर्विचार करायला हवा आणि कोणत्या खेळाडूंवर अनावश्यक विश्वास दाखवला जात आहे, या प्रश्नांची उत्तरे शोधल्याशिवाय खाईस्टचर्चमध्ये यश मिळवणे सोपे नाही.

प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्या कार्यपद्धतीवर यापूर्वीही संघनिवड, खेळाडूंना दिल्या जाणाऱ्या संधी आणि रणनिती याबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत. वेलिंग्टन कसोटीतील काही निर्णयांमुळे ही चर्चा अधिक तीव्र झाली आहे. आता गंभीर यांच्यासमोर खरा कस आहे. ते आपल्या आधीच्या निर्णयांचे समर्थन करण्यासाठी पुन्हा त्याच खेळाडूंवर ठाम राहणार, की परिस्थितीचा वस्तुनिष्ठ विचार करून संघहिताला प्राधान्य देणार? हा केवळ अकरा खेळाडू निवडण्याचा प्रश्न नाही. हा प्रशिक्षकाच्या निर्णयक्षमतेचा, नेतृत्वाच्या परिपक्वतेचा आणि भारतीय कसोटी क्रिकेटच्या भवितव्याचा प्रश्न आहे.

वेलिंग्टनच्या चुका खाईस्टचर्चमध्ये पुन्हा नकोत

वेलिंग्टन कसोटीचा पहिला दिवस भारतीय संघासाठी आशादायक होता. न्यूझीलंडची अवस्था ७० धावांत ५ बाद अशी झाली होती. प्रतिस्पर्धी संघाला मोठ्या धावसंख्येपासून रोखण्याची आणि सामन्यावर पकड मिळवण्याची सुवर्णसंधी भारतासमोर होती. मात्र त्यानंतर भारतीय गोलंदाजांना ही पकड अधिक घट्ट करता आली नाही. जसप्रीत बुमराहने प्रभावी मारा केला; पण त्याला अपेक्षित साथ मिळाली नाही. परिणामी न्यूझीलंडने सामन्यात पुनरागमन केले आणि भारताच्या विजयाच्या आशा धूसर झाल्या. विशेष म्हणजे अखेरच्या दिवशी खेळासाठी वेळ शिल्लक असतानाही सामना अनिर्णित ठेवण्याच्या निर्णयाने भारतीय क्रिकेटप्रेमींच्या नाराजीमध्ये भर घातली. विजयाची शक्यता जिवंत असताना लढण्याची मानसिकता कुठे हरवली, हा प्रश्न आजही अनुत्तरित आहे. मात्र आता मागील सामन्याच्या निराशेत अडकून राहण्यापेक्षा त्यातील चुका दुरुस्त करणे अधिक महत्त्वाचे आहे. खाईस्टचर्चची खेळपट्टी वेलिंग्टनपेक्षा वेगवान गोलंदाजांना अधिक मदत करू शकते. त्यामुळे या वेळी गोलंदाजीची योग्य रचना करणे निर्णायक ठरणार आहे.

गोलंदाजीच्या निवडीतच खरी कसोटी

भारतीय संघाच्या गोलंदाजी विभागात सध्या अनेक पर्याय उपलब्ध आहेत. जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज, आकाशदीप, प्रसिद्ध कृष्णा, अंशुल कंबोज आणि गुरनूर ब्रार या वेगवान गोलंदाजांमधून योग्य चार जणांची निवड करणे हे संघव्यवस्थापनापुढील मोठे आव्हान आहे.

वेलिंग्टन कसोटीत बुमराहने ४९, अंशुल कंबोजने ४५, प्रसिद्ध कृष्णाने ४५ आणि आकाशदीपने ४३ षटके टाकली. म्हणजेच चारही वेगवान गोलंदाजांवर मोठा ताण पडला. त्यामुळे केवळ खेळाडूंची नावे पाहून नव्हे, तर त्यांची तंदुरुस्ती, कार्यक्षमता, अनुभव आणि खाईस्टचर्चच्या परिस्थितीचा विचार करून निर्णय घ्यावा लागेल.

मोहम्मद सिराजला आणखी किती काळ बाहेर ठेवणार?

हा सर्वांत चर्चेचा मुद्दा आहे. सिराज हा केवळ वेगवान गोलंदाज नाही, तर प्रतिस्पर्धी फलंदाजांवर मानसिक दबाव निर्माण करण्याची क्षमता असलेला आक्रमक गोलंदाज आहे. त्याची ऊर्जा, सातत्य आणि विकेट मिळवण्याची जिद्द भारतीय गोलंदाजीला वेगळी धार देऊ शकते. वेलिंग्टनमध्ये न्यूझीलंडचे फलंदाज स्थिरावल्यानंतर भारतीय गोलंदाजांना सातत्याने धोकादायक मारा करता आला नाही. अशा वेळी सिराजसारख्या अनुभवी गोलंदाजाची उणीव जाणवणे स्वाभाविक आहे. खाईस्टचर्चमध्ये नव्या चेंडूवर बुमराह आणि सिराज ही जोडी न्यूझीलंडच्या फलंदाजांना अडचणीत आणू शकते. सिराजला वगळण्यामागे त्याच्या सरावातील किंवा सध्याच्या फॉर्ममधील काही कारणे असू शकतात. मात्र केवळ सरावातील निरीक्षणांवर त्याच्या आंतरराष्ट्रीय अनुभवाला दुय्यम स्थान देणे योग्य ठरेल का ? हा प्रश्न गंभीर यांनी स्वतःला विचारायला हवा.

२०२० पासून सेना देशांमध्ये भारताने मिळवलेल्या नऊ कसोटी विजयांमध्ये सिराजचा सहभाग राहिला आहे, ही बाबही दुर्लक्ष करण्यासारखी नाही. विशेष म्हणजे चालू डब्ल्यूटीसी चक्रात जगातील सर्व गोलंदाजांत सर्वाधिक बळी घेणारा तोच आघाडीचा गोलंदाज आहे.

अंशुल कंबोज की गुरनूर ब्रार?

अंशुल कंबोजने वेलिंग्टनमध्ये फलंदाजीत ३८ धावांचे योगदान दिले आणि गोलंदाजीत तीन बळी मिळवले. त्याच्यात अष्टपैलू योगदान देण्याची क्षमता आहे. परंतु कसोटी संघात त्याची निवड नेमकी फलंदाजीसाठी आहे की प्रभावी वेगवान गोलंदाजीसाठी, याबाबत भूमिका स्पष्ट असली पाहिजे.

दुसरीकडे गुरनूर ब्रारने एकदिवसीय मालिकेत नऊ बळी मिळवत आपली क्षमता सिद्ध केली आणि मालिकावीराचा किताब पटकावला. त्यानंतर त्याला कसोटी संघात स्थान देण्यात आले. त्याचा वेग आणि अतिरिक्त उसळी खाईस्टचर्चच्या खेळपट्टीवर उपयोगी ठरू शकते. मात्र एकदिवसीय क्रिकेटमधील यश म्हणजे कसोटीतील यशाची हमी नव्हे. त्यामुळे त्याला पदार्पणाची संधी द्यायची असल्यास त्याच्या तांत्रिक क्षमतेचाही विचार आवश्यक आहे.

प्रसिद्ध कृष्णा आणि आकाशदीप यांच्याबाबतही वस्तुनिष्ठ निर्णय हवा

प्रसिद्ध कृष्णाकडे उंचीमुळे अतिरिक्त उसळी मिळवण्याची क्षमता आहे. आकाशदीपकडे नव्या चेंडूने प्रभावी मारा करण्याची क्षमता आहे. मात्र एखाद्या खेळाडूला आधी संधी दिली म्हणून त्याला प्रत्येक सामन्यात स्थान मिळायलाच हवे, असा नियम नसतो. त्याचप्रमाणे एका सामन्यात अपेक्षित कामगिरी झाली नाही म्हणून खेळाडूला कायमचे बाजूला करणेही योग्य नाही. संघ निवडीत नावापेक्षा त्या दिवसाची परिस्थिती, प्रतिस्पर्ध्याची फलंदाजी आणि खेळाडूची प्रत्यक्ष उपयुक्तता महत्त्वाची असली पाहिजे.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com / ई-पेपर : epaper.sinhvani.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

भूमि अभिलेख विभागाच्या २० सेवांचे सुसूत्रीकरण

जलद कामकाजासाठी सहा प्रमुख सेवांमध्ये रूपांतर : फडणवीस सरकारचा निर्णय, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा पुढाकार

दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई

राज्यातल्या जनतेची जमीन आणि मालमत्तेशी निगडित कामं झटपट, स्पष्ट आणि सोपी व्हावीत, यासाठी भूमि अभिलेख विभागाच्या कामाची पद्धत बदलून ती अधिक सुटसुटीत करण्यात आली आहे. आधीच्या २० सेवांपैकी काही सेवा एकत्र केल्या आहेत, गरज नसलेल्या काही सेवा बंद केल्या आहेत आणि एका नव्या सेवेची भर घालून एकूण ६ मुख्य सेवा तयार केल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला आहे.

नियोजन विभागाच्या नियमांप्रमाणे आणि मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या मंजुरीनंतर महसूल विभागाने आदेश काढला. यानुसार नागरिकांसाठी, सरकारी विभागांसाठी आणि व्यापाऱ्यांसाठी असलेल्या या ६ मुख्य सेवा ऑनलाइन पोर्टल, 'आपले सरकार' आणि 'मैत्री' पोर्टलवर उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

-सहा सेवांमध्ये खालील सेवांचा समावेश आहे.

- सगळ्या प्रकारची जमीन मोजणी (काम पूर्ण झाल्यावर मोजणी नकाशाची 'क' प्रत देणं)
- आकारफोड / कमी-जास्त पत्रक तयार करणं आणि नकाशात दुरुस्ती करणं
- सगळ्या प्रकारच्या फेरफार नोंदी
- ऑनलाइन नसलेले नकाशे किंवा जुने कागदपत्र उपलब्ध करून देणं
- मिळकत पत्रिकेचे भाग पाडून स्वतंत्र मिळकत पत्रिका तयार करणं
-भूसंपादनामध्ये रस्ता, रस्ता सेट बॅक आणि आरक्षित जागेसाठी स्वतंत्र मिळकत पत्रिका तयार करणं.
- सगळ्या प्रकारची जमीन मोजणी (काम पूर्ण झाल्यावर क्षेत्रबुक, प्रतिबुक, शेतपुस्तक, जबाब, फाळणी, आकारबंद, गटनकाशा, मोजणी नकाशा आणि अपील निकालाच्या नकला यांसारख्या सेवांचा समावेश आहे. तसंच नेहमीची आणि घाईची मोजणी, वेगवेगळ्या प्रकारची आकारफोड, कमी-जास्त पत्रकाला मंजुरी, सगळ्या कागदपत्रांचं स्कॅनिंग आणि संगणकीकरण होऊन ती आधीच ऑनलाइन दिसतात, अशा कागदपत्रांच्या प्रती देणाऱ्या सेवा बंद करण्यात आल्या आहेत. यामध्ये मिळकत पत्रिका, मुंबई उपनगर मिळकत पत्रिका, टिपण, कागदपत्रांचा फेरफार नोंदी, मिळकत पत्रिकेचे भाग पाडणं आणि भूसंपादनाची स्वतंत्र मिळकत पत्रिका यांसारख्या सारख्याच कामांच्या सेवा एकत्र केल्या आहेत. याशिवाय, जे मूळ कागदपत्र किंवा नकाशे अजून ऑनलाइन नाहीत, त्यांचं स्कॅनिंग आणि माहिती भरून ती 'ई-महाभूमी' पोर्टलवर टाकण्याची नवी सेवा सुरू केली आहे.

तक्रार आणि अंमलबजावणी कशी होणार?

या कामांबाबत काही तक्रार किंवा अपील करायचं असेल, तर पहिल्या अपीलासाठी जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख किंवा उप अधीक्षक भूमि अभिलेख / नगर भूमापन अधिकारी असतील. दुसऱ्या अपीलासाठी उपसंचालक भूमि अभिलेख यांच्याकडे जाता येईल. हा निर्णय व्यवस्थित राबवण्यासाठीचे नियम आणि तांत्रिक सूचना जमाबंदी आयुक्त व संचालक भूमि अभिलेख (पुणे) देतील. तर ऑनलाइन व्यवस्था तयार करून ती जोडण्याचं काम भूमि अभिलेख विभाग आणि 'महाआयटी' करतील.

नागरिकांना शासनाच्या सेवा अधिक जलद, पारदर्शक आणि पूर्णतः डिजिटल स्वरूपात मिळाव्यात, यासाठी आम्ही काम करत आहोत. भूमि अभिलेख विभागाच्या २० सेवांचे सुसूत्रीकरण करून ६ प्रमुख सेवांमध्ये रूपांतर केल्यामुळे अनावश्यक कागदपत्रे, फेऱ्या आणि मंजुरीचे टप्पे कमी होतील तसेच सर्व सेवा कालबद्ध पद्धतीने उपलब्ध होतील."

- चंद्रशेखर बावनकुळे, महसूलमंत्री, महाराष्ट्र

थोडक्यात

प्रकाश हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज कांद्री माईन येथे संविधान दिवस उत्साहात साजरा

संविधान रॅली, प्रश्नमंजुषा स्पर्धा व बक्षीस वितरण कार्यक्रमाचे आयोजन



दै. सिंहवाणी वृत्त, कांद्री माईन

प्रकाश हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज कांद्री माईन येथे भारतीय संविधान दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. भारतीय संविधानाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे, त्यांच्यामध्ये संविधानाविषयी जागरूकता निर्माण व्हावी तसेच लोकशाही मूल्यांची रुजवण व्हावी, या उद्देशाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक मिलिंद वानखेडे उपस्थित होते कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी संविधान जनजागृती रॅली काढण्यात आली. या रॅलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी संविधानाचे महत्त्व, मूलभूत अधिकार, कर्तव्ये तसेच राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला. त्यानंतर विद्यार्थ्यांसाठी भारतीय संविधानावर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन कामिनी पाटील यांनी केले या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. संविधानाची निर्मिती, संविधान सभेचे कार्य, भारतीय लोकशाही व्यवस्था, मूलभूत अधिकार व कर्तव्ये यांसारख्या विषयांवर विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्यात आले.

प्रश्नमंजुषा स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करून गौरविण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडली असून संविधानाविषयी आदर आणि जागरूकता निर्माण झाली. कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाचे महत्त्व, लोकशाही मूल्ये आणि जबाबदार नागरिक म्हणून आपली कर्तव्ये यांची जाणीव करून देण्यात आली. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय भावना, सामाजिक बांधिलकी आणि संविधानाविषयी अभिमान निर्माण होण्यास मदत होते. प्रकाश हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज कांद्री माईन येथे आयोजित हा संविधान दिवस विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक व प्रेरणादायी ठरला. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

संविधान दिनानिमित्त महामानवाला अनुयायांचे अभिवादन, संविधान प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन



दै. सिंहवाणी वृत्त, वाडी

भारतीय संविधान दिनानिमित्त वाडी येथे अमरावती महामार्गावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा प्रांगणात विविध पक्ष संघटनांच्या वतीने संविधान दिनानिमित्त प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. या अभिवादन कार्यक्रमात उपस्थितानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, तथागत गौतम बुद्ध व सम्राट अशोक यांच्या पुतळ्याला हार अर्पण करण्यासह अगरबत्ती मेणबत्ती प्रज्वलित करून अभिवादन केले. यावेळी मधु माणके पाटील यांनी संविधान प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन केले. तर दिलीप भोरगडे यांनी सामूहिक बुद्ध वंदना घेतली. सामाजिक कार्यकर्ते चंद्रशेखर येवले यांनी वर्तमान शासनकर्त्यांकडून देशात विषमता पसरविण्याचे काम होत असून लोकशाही धोक्यात आली असल्याचे सांगून यामुळे संविधानाला धोका निर्माण झाल्याने बहुजन समाजाच्या एकजुटीची गरज असल्याचे मनोगत व्यक्त केले. या अभिवादन कार्यक्रमाला न.प.चे विरोधी गटनेते श्याम मंडपे, बांधकाम सभापती दिनेश कोचे, नगरसेवक राजेश जंगले, नगरसेविका शितल नंदागवळी, सुनीता मेश्राम, वाडी विकास संघर्ष आघाडीचे मधु माणके पाटील, चंद्रशेखर येवले, अमित हुसनापुरे, अशोक गडलिगे, संदीप रायजादा, शरद इंगळे, जेम्स फ्रान्सिस, शिवम राजे, अक्षय जवादे, स्मारक समितीचे दिनेश बनसोड, प्रकाश गजभिये, रोशन सोमकुवर सह सामाजिक कार्यकर्ते दिलीप भोरगडे, भीमराव कांबळे, किशोर नागपूरकर, पंडित भोरगडे, अनिल पुंड, भीमराव जी शेंडे, जितेंद्र पानतावणे, भोजराज नंदागवळी, ईश्वर उके, प्रेम ठवरे, देवा दिवे, देवा राऊत इत्यादी सह मोठ्या संख्येने अनुयायी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन नगरसेवक राजेश जंगले यांनी केले.

बहुजन समाज पार्टी वाडी शहराच्यावतीने ७७ व्या संविधान दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर, तथागत बुद्ध व अशोक स्तंभाला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. सोबतच संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन करण्यात आले. कार्यक्रमात यावेळी बसपा प्रभारी सुधाकर सोनपिंपळे यांनी उपस्थितांना संविधान दिनाचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाला नागपूर जिल्हा प्रभारी राजकुमार बोरकर, सुधाष सुखदेवे, कैलास गणवीर, आयुष खंडारे, सतीश डोंगरे, मनीष रामटेके, कुणाल मेश्राम, किशोर इंगळे, मधुकर शेंडे, शुभम टेंभूर्ण, यशवंत रंगारी, विवेक गाडगे, सुमित गजभिये, रितिक रंगारी, सोनू मेश्राम हे उपस्थित होते. संविधान दिनानिमित्त शिवसेना वाडी शहर च्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतीमेला पुष्पहार अर्पण करुन मानवंदना देण्यात आली.याप्रसंगी शाळेच्या मुलांना बिस्कुट वाटप करण्यात आले. या अभिवादन कार्यक्रमाला युवा सेना जिल्हाप्रमुख अखिल पोहनकर सह दिनेश मलोडे, उत्तम दास, धनराज गिरिपुंजे, सौरभ चांदेकर, युवराज गिरिपुंजे, पवन लाडे, धनराज लांडगे, आकाश पटोले, नितेश जटाने, रवि त्रिपाठी इत्यादी उपस्थित होते.

सार्वजनिक बांधकाम विभागात संविधान दिन उत्साहात साजरा : अधिकारी-कर्मचाऱ्यांनी घेतली संविधान रक्षणाची शपथ



दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर-धनंजय पांढरे

भारतीय संविधान दिनानिमित्त बल्लारपूर येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपविभागीय कार्यालयात २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करून अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संविधानातील मूलभूत मूल्यांचे जतन आणि संवर्धन करण्याची शपथ घेतली. भारतीय संविधान हे देशाच्या लोकशाही व्यवस्थेचा भक्कम पाया असून स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांवर भारतीय प्रजासत्ताकाची वाटचाल सुरू आहे. संविधानाने प्रत्येक नागरिकाला समान हक्क, स्वातंत्र्य आणि न्यायाची हमी दिली आहे. या मूल्यांचे पालन करणे ही प्रत्येक नागरिकासोबतच शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांचीही महत्त्वाची जबाबदारी असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

या कार्यक्रमाला उपविभागीय अभियंता संजोग मेंढे, सार्वजनिक बांधकाम उपविभागीय कार्यालयाचे अभियंता वैभव जोशी, पवन सावरकर, अनिल आंबटकर, विनायक काकडे आणि हनीफ कुरेशी उपस्थित होते. तसेच कार्यालयीन कर्मचारी अरविंद कुचनकर, राहुल कुंदोजवार, परिवर्तन वरखेडे, शीतल पोडे, माधवी मेश्राम, हरिदास डंबारे, बावणे, गिरडकर, सौदागर, महेश उईके आणि प्रसाद कातपातळ यांच्यासह अन्य कर्मचारी उपस्थित होते.संविधान दिनाच्या निमित्ताने आयोजित या कार्यक्रमातून संविधानाप्रती आदर, लोकशाही मूल्यांची जपणूक आणि कर्तव्यनिष्ठेचा संदेश देण्यात आला. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संविधानाने दिलेल्या मूल्यांनुसार आपली शासकीय जबाबदारी पार पाडण्याचा निर्धार व्यक्त केला.

कवी गझलकार विजय वासाडे यांच्या "गहिरे अंतरंग" काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा उत्साहात

साहित्यिकांनी सर्व साहित्य प्रकार हाताळावे : संमेलनाध्यक्ष चंद्रकांतदादा वानखेडे, डॉ. नीता कचवे, शंकर घोरसे 'चारोळी मंच साहित्य सेवा सन्मान २०२६'ने सन्मानित



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

साहित्य, संवेदना आणि शब्दांच्या सुमधुर लयीत न्हाऊन निघालेला एक अविस्मरणीय सोहळा म्हणजेच 'जागर मायमराठीचा' (पर्व - तिसरे)! वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर आणि चारोळी मंच, पुणे (शाखा-नागपूर) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हे राज्यस्तरीय कविसंमेलन मंगळवार, दि. २४ नोव्हेंबर २०२६ रोजी नागपूर येथील वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्थेच्या प्रांगणात अत्यंत दिमाखदार व चैतन्यमय वातावरणात पार पडले.

मायमराठीचा हा जागर शब्दांच्या फुलांनी आणि रसिकांच्या उत्स्फूर्त दादने अक्षरशः बहरून गेला. या साहित्यिक यज्ञकुंडाचे प्रज्वलन, अर्थात सोहळ्याचे उद्घाटन अक्षरक्रांती फाऊंडेशनचे अध्यक्ष शंकरराव घोरसे यांच्या शुभहस्ते झाले. पुण्याचे सुप्रसिद्ध साहित्यिक चंद्रकांतदादा वानखेडे यांनी संमेलनाध्यक्षपद भूषवत आपल्या ओघवत्या वाणीने रसिकांची मने जिंकली, तर संस्थेचे प्राचार्य प्रो. डॉ. मनोहर कुंभारे यांनी स्वागताध्यक्ष म्हणून सर्वांचे आत्मीयतेने स्वागत केले.

या काव्यमेळाव्याला प्रमुख अतिथी म्हणून नागपूरचे सुप्रसिद्ध साहित्यिक व समीक्षक प्रभाकर तांडेकर 'प्रदत्त', होते त्यांनीच कवी विजय वासाडे यांच्या संग्रहाचे अंतरंग उलगडून सांगितले. अमरावतीच्या बांधिलकी प्रतिष्ठानच्या अध्यक्षा डॉ. नीता कचवे, सामाजिक कार्यकर्ते जीवन मुंगले, सुरेंद्र बुधे आणि संस्थेचे संस्कृत विभाग प्रमुख डॉ. अरुण पवार, मराठी विभाग प्रमुख प्रा. कांबळे, पत्रकार किशोर वासाडे, ज्ञानपथ प्रकाशनचे सचिन सुकलकर यांची उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या विचारांनी आणि मार्गदर्शनाने या सोहळ्याची उंची अधिकच वाढली.

शब्दांच्या या उत्सवात साहित्याची दोन नवी लेणी रसिकांसमोर उलगडली गेली. मान्यवरांच्या शुभहस्ते कवी विजय वासाडे यांच्या 'गहिरं अंतरंग' आणि कवी चंद्रकांत वानखेडे यांच्या 'मनाच्या उंबरठ्यावर' या दोन भावस्पर्शी काव्यसंग्रहांचे दिमाखदार प्रकाशन संपन्न झाले. यासोबतच, आपल्या कार्याचा अमीट ठसा उमटवणाऱ्या शंकरराव घोरसे, डॉ. नीता कचवे यांना चारोळी मंच साहित्य सेवा समान २०२६ ने सन्मानित करण्यात आले. प्रस्तुत कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध कवी साहित्यिका दोन नवी लेणी रसिकांसमोर उलगडली गेली. मान्यवरांच्या शुभहस्ते कवी विजय वासाडे यांच्या 'गहिरं अंतरंग' आणि कवी चंद्रकांत वानखेडे यांच्या 'मनाच्या उंबरठ्यावर' या दोन भावस्पर्शी काव्यसंग्रहांचे दिमाखदार प्रकाशन संपन्न झाले. यासोबतच, आपल्या कार्याचा अमीट ठसा उमटवणाऱ्या शंकरराव घोरसे, डॉ. नीता कचवे यांना चारोळी मंच साहित्य सेवा समान २०२६ ने सन्मानित करण्यात आले. प्रस्तुत कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध कवी साहित्यिका दोन नवी लेणी रसिकांसमोर उलगडली गेली. मान्यवरांच्या शुभहस्ते कवी विजय वासाडे यांच्या 'गहिरं अंतरंग' आणि कवी चंद्रकांत वानखेडे यांच्या 'मनाच्या उंबरठ्यावर' या दोन भावस्पर्शी काव्यसंग्रहांचे दिमाखदार प्रकाशन संपन्न झाले. यासोबतच, आपल्या कार्याचा अमीट ठसा उमटवणाऱ्या शंकरराव घोरसे, डॉ. नीता कचवे यांना चारोळी मंच साहित्य सेवा समान २०२६ ने सन्मानित करण्यात आले. प्रस्तुत कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध कवी साहित्यिका दोन नवी लेणी रसिकांसमोर उलगडली गेली. मान्यवरांच्या शुभहस्ते कवी विजय वासाडे यांच्या 'गहिरं

कामगारांच्या २० मागण्या पूर्ण करा, अन्यथा एनटीपीसी बंद करण्याचा इशारा : खा. बर्वे

दै. सिंहवाणी वृत्त, मौदा

दिनांक २५ नोव्हेंबर २०२६ रोजी एनर्जी वर्कफोर्स युनियनच्या वतीने एनटीपीसी मौदा गेट क्रमांक १ येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य गेट सभेला हजारोंच्या संख्येने कामगार बांधवांनी उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी आणि प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी आयोजित करण्यात आलेल्या या सभेत एनटीपीसी प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

एनर्जी वर्कफोर्स युनियनच्या वतीने एनटीपीसी प्रशासनाकडे कामगारांच्या एकूण २० मागण्या मांडण्यात आल्या आहेत. यामध्ये वार्षिक वेतनवाढ, कामगार व त्यांच्या कुटुंबीयांसाठी आरोग्य विमा, सशुल्क रजा, आकस्मिक व नैमित्तिक रजा, आजारपणाची रजा, अपघाती मृत्यू विमा, ग्रॅच्युइटीचा लाभ, कामाचा अनुभव व सेवाज्येष्ठतेनुसार वेतनवाढ, वैद्यकीय कारणास्तव कामगारांना नोकरीवरून न काढणे, सर्व कामगारांना दर्जेदार



दोन गणवेश, सुरक्षा साहित्य, सण-उत्सवासाठी आगाऊ रक्कम, कँटीन सुविधा, वार्षिक बोनस, कामगारांच्या पाल्यांना शिक्षण भत्ता, ओव्हरटाईमचा मोबदला, वाहन पार्किंगची सुरक्षित व्यवस्था, वेळेवर वेतन आणि शिफ्ट ड्युटी करणाऱ्या कामगारांना दरमहा ५०० रुपये शिफ्ट भत्ता आदी महत्त्वपूर्ण मागण्यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, एनटीपीसी मौदा ही कंपनी नगरपंचायतीच्या हद्दीत येत असल्याने कामगारांना झोन-अ च्या नियमानुसार वेतन देण्यात यावे, अशी ठाम मागणीही यावेळी करण्यात आली. या भव्य सभेला रामटेक लोकसभा क्षेत्राचे खासदार श्यामकुमार बर्वे, माजी मंत्री सुनील केदार आणि माजी मंत्री राजेंद्र मुळक यांची प्रमुख उपस्थिती होती.

सभेचे नेतृत्व करताना एनर्जी वर्कफोर्स युनियनचे अध्यक्ष देवेंद्र गोडबोले यांनी अत्यंत आक्रमक भूमिका घेत ठळढड प्रशासनाला स्पष्ट शब्दांत इशारा दिला.

ते म्हणाले की, कामगारांच्या घामावर एनटीपीसी सारखा मोठा प्रकल्प उभा आहे. मात्र, त्याच कामगारांना त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी वारंवार संघर्ष करावा लागत असेल, तर ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. कामगारांच्या २० मागण्या या कोणत्याही प्रकारच्या अवाजवी मागण्या नसून त्यांच्या कष्टाचा आणि हक्काचा विषय आहे.

येत्या ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत कामगारांच्या सर्व २० मागण्या पूर्ण करण्यात याव्यात. अन्यथा कामगारांना सोबत घेऊन एनटीपीसी प्रशासनाला प्रकल्प बंद करण्याच्या निर्णयापर्यंत जाण्यास भाग पाडू, असा ठाम इशारा देवेंद्र गोडबोले यांनी दिला.

यावेळी माजी मंत्री सुनील केदार यांनीही शासन आणि एनटीपीसी प्रशासनाला धारेवर धरले. देवेंद्र गोडबोले यांच्या नेतृत्वाखाली कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी सुरू असलेला हा लढा महत्त्वाचा असून कामगारांच्या मागण्या पूर्ण न झाल्यास गोडबोले हे कोणत्याही टोकाचा संघर्ष करण्यास मागेपुढे पाहणार नाहीत; मात्र कामगारांना कधीही एकटे सोडणार नाहीत, अशा शब्दांत त्यांनी आपली भूमिका मांडली.

खासदार श्यामकुमार बर्वे यांनी एनटीपीसी प्रशासन आणि शासनाला कामगारांच्या प्रश्नांवर गांभीर्याने निर्णय घेण्याचे आवाहन केले. कामगारांच्या हितासाठी तातडीने घेण्यात यावेत, अशी मागणी करत त्यांनी स्वतः दिल्लीत जाऊन एनटीपीसीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून कामगारांच्या सर्व मागण्यांच्या पूर्ततेसाठी प्रयत्न करण्याची ग्वाही दिली. या सभेमुळे एनटीपीसी मौदा परिसरातील कंत्राटी कामगारांच्या प्रश्नांना पुन्हा एकदा व्यापक स्वरूप प्राप्त झाले असून, आता एनटीपीसी प्रशासन ३१ डिसेंबरपूर्वी कोणता निर्णय घेते, याकडे हजारो कामगारांचे लक्ष लागले आहे.

कामगारांच्या हक्कांसाठी संघर्ष सुरूच राहणार, अन्यायाविरुद्ध आवाज उठतच राहणार!

या भव्य गेट सभेला खासदार श्यामकुमार बर्वे, माजी मंत्री सुनील केदार,माजी मंत्री राजेंद्र मुलक, एनर्जी वर्क फोर्स यूनियनचे अध्यक्ष देवेंद्र गोडबोले, उपाध्यक्ष मनीष चौळे, सचिव राजकुमार वजेकर, सदस्य राकेश मोटघरे, जितेंद्र गोरले, ध्यानेश्वर लांडे, जितेंद्र गोडबोले, रवींद्र सावरकर, सतीश बावणकुळे, प्रशांत डांगरे, विष्णू साठवणे, पारश्राम घारड, श्रीकांत गेडेकर, विनोद लेंडे, कृष्णा कार्डभाजने, हरिचंद्र वडे, विलास कुंभलकर, अमोल साखरवाडे, संजय सटकर, सोपान सिनपुरे, माजी सभापती जिल्हापरिषद अर्वातिका ताई लेकुलवारे, तुळशीराम काळभिघ, ध्यानेश्वर वानखेडे, राजेश निनावे, जितू साठवणे, स्वप्निल श्रवणकर, युवराज ठाकरे, भारतीताई गोडबोले, रंजनाताई धनजोडे व हजारोंच्या संख्येने कामगार बांधव उपस्थित होते.

निशिकांत मायी यांना उत्कृष्ट वांग्मय पुरस्कार

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

संकेत प्रकाशन हातरूण जिल्हा अकोला यांच्या वतीने सन २०२६-२७ करिता देण्यात येणाऱ्या साप्ताहिक शब्दशिल्प उत्कृष्ट वांग्मय



पुरस्कार दैनिक तरुण भारत नागपूरचे उपसंपादक निशिकांत नारायणराव मायी यांना जाहीर करण्यात आला आहे. निशिकांत मायी यांच्या 'अशी पाखरे येती' या पुस्तकाकरिता हा पुरस्कार जाहीर झाला असून पुरस्कार वितरण लवकरच होणार असल्याचे संकेत प्रकाशनचे प्रकाशक प्रमोद रोहनकर तसेच साप्ताहिक शब्दशिल्पच्या संचालिका सुनीता खडसान यांनी कळविले आहे.

थोडक्यात

भारतीय संविधान जीवन जगण्याची संविधानीक ताकत होय : यशवंत तेलंग

२६ नोव्हेंबर २०२६ संविधान दिवस अभियान समारोह



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

गुरुवारी २६ नोव्हेंबर २०२६ रोजी संविधान दिवस अभियान समारोह संविधान मुलभूत अधिकार अभियान २०२६ ते २०२७ या दरम्यान उपरोक्त संघटने तर्फे यशवंत तेलंग यांच्या नेतृत्वात संविधान चौक नागपूर येथून आरंभ करून महाराष्ट्र व इतर राज्यात या अभिनाअंतर्गत राज्यासह देशातील ९४ लाख बंद झालेल्या शाळा त्वरीत सुरू करण्यात यावेत. तसेच सुरू असलेल्या शासकीय शाळांची रंगरंगोटी, पिण्याच्या पाण्याची सोय, शौचालय, विधुत व्यवस्था, पंखे, व सेमी इंग्रजी माध्यमानुसार आरंभ करण्यात यावेत. शैक्षणाचे राष्ट्रीयकरण करण्यात यावे, दलीत, आदिवासी यांच्यावर होणाऱ्या अन्याय अर्थात जल, जमीन, जंगलची लुट व हजारो वर्षाचे जंगल व तेथील वृक्ष यांची होणारी कत्तल त्वरीत थाबवून विस्तापित होणाऱ्या दलीत आदिवासी यांचे पुर्णवर्सन करण्यात यावे, राज्यातील १६ हजार कारखान बंद पडलेले आहेत त्यांना पुन्हा सुरू करण्यासाठी शासनाने आर्थिक मदतीसह पुढे होवून सुरू करण्याचा प्रयत्न करून बेरोजगारी दूर करून बेरोजगारांना रोजगार देण्याचा संविधानीक मूलभूत अधिकार बहाल करावा. निकृष्ट रस्ते व पुल यांचे फॅक्ट कमेटी द्वारा चौकशी करून होणारे अपघात टाळण्यासाठी दोषींना अटक करून अपघात मुक्त भारत होण्यास विशेष एस.आय.टी गटीत करावी.

या देशात विविध भेडसावणाऱ्या कर्जबाजारी शेतकरी व सामान्य परिवारांना त्यांचे कर्ज, उद्योगपतीना ज्या प्रमाणे कर्ज माफ केले जाते त्या प्रमाणे यांचे कर्ज सुध्दा माफ करून कर्जमुक्त भारत निर्माण करावा या विविध प्रश्नांवर संविधान मुलभूत अधिकार अभियान २०२६ ते २०२७ या दरम्यान उपरोक्त संघटने तर्फे यशवंत तेलंग यांच्या नेतृत्वात संघटनेचे मान्यवर केवलदास टेंभेकर, विरेन्द्र दहीकर, योगेश ठाकरे, संदिप सिंग, फेज कुरेशी, इत्यादी प्रमुखांच्या उपस्थितीत उपरोक्त अभियान राबविण्याचा संकल्प करण्यात आला. या संकल्पनानेच संविधान दिवस साजरा करण्याची शपथ संविधान प्रस्थावनेचे वाचन करून घेतली. यासाठी यशवंत तेलंग, संदिपसिंग, योगेश ठाकरे, केवलदास टेंभेकर, विरेन्द्र दहीकर हे होते.

सोनिया गांधी यांच्या आत्मचरित्रावर दयाशंकर तिवारी यांचे व्याख्यान

'बिलॉगिंग, अ लव्ह स्टोरी' आणि संभाव्य राजकीय पडसाद या विषयावर २९ नोव्हेंबरला सन्मित्र सभेचा कार्यक्रम

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

सन्मित्र सभेच्या वतीने रविवार, २९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता. नागपूरचे माजी महापौर, भारतीय जनता पक्ष नागपूर महानगरचे अध्यक्ष तथा प्रखर वक्ते दयाशंकर तिवारी यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. 'सोनिया गांधी यांचे आत्मचरित्र (बिलॉगिंग, अ लव्ह स्टोरी) आणि त्याचे संभाव्य राजकीय पडसाद' हा व्याख्यानाचा विषय असून, या विषयाच्या अनुषंगाने राजकीय, सामाजिक तसेच समकालीन घडामोडींवर विचारमंथन होणार आहे. हे व्याख्यान गोकुलपेठ येथील डॉ. हेडगेवार रक्तपेढीच्या अनंतराव भिडे सभागृहात आयोजित करण्यात आले आहे. सोनिया गांधी यांच्या आत्मचरित्राच्या माध्यमातून त्यांच्या जीवनप्रवासातील विविध पैलू, राजकीय वाटचाल, पुस्तकातील संदर्भ आणि त्यातून भारतीय राजकारणात उमटू शकणारे संभाव्य परिणाम यावर दयाशंकर तिवारी आपल्या व्याख्यानातून भाष्य करणार आहेत.



राजकीय विषयांवर अभ्यासपूर्ण मांडणी आणि प्रभावी वक्तृत्वासाठी परिचित असलेले दयाशंकर तिवारी यांच्या या व्याख्यानातून उपस्थितांना विषयाची विविध अंगांनी माहिती मिळण्याची संधी लाभणार आहे. सद्य राजकीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर या व्याख्यानाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या कार्यक्रमाला नागरिक, राजकीय विषयांचे अभ्यासक, विचारवंत आणि इच्छुकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सन्मित्र सभेच्या कार्यकारिणीने केले आहे.

उमियाशंकर शाळेत संविधान दिन उत्साहात



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

श्री नागपूर गुजराती मंडळ द्वारा संचालित क्वेटा कॉलनी, लकडगंज परिसरातील श्री उमिया शंकर नारायणजी हायस्कूल येथे संविधान दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शाळेतील शिक्षिका शुभांगी दवे यांनी संविधानाचे महत्त्व समजावून सांगितले. तसेच शाळेतील शिक्षिका लीना पांडे यांच्या पाठोपाठ सर्व विद्यार्थ्यांनी संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन केले. तसेच वर्ग नववीचे विद्यार्थी राजकुमार पांडे आणि सार्थक पोटे यांनी सुद्धा संविधानाच्या महत्त्वावर प्रकाश टाकला. यावेळी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन शाळेतील ग्रीन हाऊस विभागातील शिक्षक अंशुल जिचकार, पल्लवी गणात्रा, सुहासिनी शुद्धलवार, कल्पना बेलेकर यांच्यातर्फे करण्यात आलेले होते.

ऑनलाइन गेमिंगचे दुष्परिणाम, मैत्रीतील संघर्ष आणि मानवतेच्या ऱ्हासाचे चित्रण

सिंधी, हिंदी व मल्याळम नाटकाचे प्रभावी सादरीकरण, २१व्या एकांकिका बहुभाषी नाट्य महोत्सवाचा चौथ्या दिवस

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

कला सागरच्यावतीने आणि विदर्भ हिंदी साहित्य सम्मेलनाच्या सहकार्याने आयोजित २१व्या एकांकिका बहुभाषी नाट्य महोत्सवाच्या चौथ्या दिवशी सिंधी एकांकिका देर आयद दुरुस्त आयद, हिंदी एक फुल तीन माली आणि मल्याळम नाटक जॉजेकुट्टु @केशटकलम डॉट कॉमचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले. ऑनलाइन गेमिंगचे दुष्परिणाम, मैत्रीतील प्रेम आणि संघर्ष तसेच समाजातील मानवतेचा होत असलेला ऱ्हास अशा विविध विषयांवर या एकांकिकांनी भाष्य केले.



आजच्या कार्यक्रमाचे उद्घाटन बिल्डर्स अँड डेव्हलपर्स, नागपूरचे आशिष नेरकर यांच्या हस्ते झाले. यावेळी कला सागरचे पदाधिकारी पदम नायर, रविशेखर गिल्लूरकर, सुशील तिवारी, रवींद्र बिजवे, डॉ. रमेश बारस्कर, रुपाली वंजारी, सविता पांडे, अरविंद लोंढे, प्रवीण एम., नीरज नंदेश्वर उद्धा, सुरेश सांगोलकर आणि संदीप डोंगरे उपस्थित होते.

सिंधुडी. युथ विंग, गुरुनानक सोसायटी, नारा रोड, नागपूर यांच्या वतीने सादर करण्यात आलेल्या 'देर आयद दुरुस्त आयद' या नाटकाचे लेखन किशोर लालवाणी यांनी तर दिग्दर्शन गुरमुख मोटवानी यांनी केले होते.

नटराज नाट्य बहुउद्देशीय संस्था, नागपूरच्या वतीने सादर करण्यात आलेल्या एक फूल तीन माली या हिंदी नाटकाचे लेखन व दिग्दर्शन किशोर वारजूकर यांनी केले होते. किशोर वारजूकर, आकाश निमजे, सुमित सपाटे, शताब्दी सहारे आणि श्रद्धा गुमगावकर यांनी भूमिका साकारल्या.

संगीत प्रशांत झाडगावकर आणि मयूर वारजूकर यांचे, तर प्रकाशयोजना व नेपथ्य मयूर वारजूकर यांचे होते. ओम प्रोडक्शन, साईबाबा कॉलनी, कोराडी रोड, नागपूर यांच्या वतीने स्वर्गीय मुजीब सिद्दिकी लिखित आणि सुरेंद्र हरडे दिग्दर्शित इन्सानियत गिर गई है हे नाटक सादर करण्यात आले. यात प्रकाश जाधव, सुरेश सांगोलकर, ज्ञानेश्वर रक्षक, रोहन शेलारे, प्रांशु गोखले आणि सुरेंद्र हरडे यांनी भूमिका साकारल्या. संगीत सेजल शिदे यांचे होते.

आज पुरस्कार वितरण

चार दिवस चाललेल्या या २१व्या एकांकिका बहुभाषी नाट्य महोत्सवाचा बक्षिस वितरण सोहळा शुक्रवार, २७ नोव्हेंबर रोजी सायं. ६ वाजता आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला नागपूर विद्यापीठाचे लोकपाल शरद त्रिवेदी, महानगरपालिकेचे सेवानिवृत्त अतिरिक्त आयुक्त हेमंत पवार, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलचे सदस्य डॉ. चंद्रशेखर गिल्लूरकर, सीए श्याम लोहकरे व सांस्कृतिक आघाडीचे अभय देशमुख यांची उपस्थिती राहणार आहे. यावेळी गीत संगीत व मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरण होणार आहे.

'तेरे सुर और मेरे गीत' २९ नोव्हेंबरला

डॉ. लोकेंद्र सिंह यांच्या कवितांची सुरेल मैफल, अरुणाई आणि सप्तक यांचे संयुक्त आयोजन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

अरुणाई आणि सप्तक नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'तेरे सुर और मेरे गीत' या विशेष संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन रविवार, २९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता दक्षिण अंबाझरी मार्गावरील मुंडले सभागृहात करण्यात आले आहे. सेंट्रल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस चे संचालक व प्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉ. लोकेंद्र सिंह डॉ. लोकेंद्र सिंह आणि डॉ. सुधीर भावे कार्यक्रमाचे सादरीकरण करणार आहेत.

वैद्यकीय सेवेसोबतच डॉ. लोकेंद्र सिंह एक संवेदनशील लेखक आणि कवी म्हणूनही ओळखले जातात. त्यांची काही पुस्तके आणि कवितासंग्रह प्रकाशित आहेत. या कार्यक्रमात डॉ. लोकेंद्र सिंह यांच्या अनेकया कवितांचे सादरीकरण करण्यात येणार असून, कवितांच्या आशयाला साजेशी हिंदी चित्रपटगीतेही गायक सादर करतील. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून नागपूरचे पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील उपस्थित राहतील. गायिका डॉ. मंजिरी अय्यर, तर गायक डॉ. सुधीर भावे, डॉ. सुरेश अय्यर आणि डॉ. निशिकांत लोखंडे हे गीतांचे सादरीकरण करतील. महेंद्र ढोले संगीत संयोजनाची जबाबदारी सांभाळतील.

हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून या विनामूल्य कार्यक्रमाला रसिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

श्री. समर्थ नागोजी महाराज उच्च कोटीचे संत होते : ग्रामगीताचार्य गणेश धर्माळे



दै. सिंहवाणी वृत्त, श्रीरामपूर

येळेगावच्या तुका माईचा कृपाप्रसाद श्री.समर्थ नागोजी महाराजांना लाभला होता दर एकादशीला सरपन,देणगी घेऊन जायचे अनेक वर्षापासूनची परंपरा आज ही जोपासली जात आहे प्रखर वैराग्य,हृदयात जिव्हाळा असणाऱ्या संत नागोजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन मांडवा ग्राम आदर्श ग्राम आहे असे प्रतिपादन मंडळाचे अध्यक्ष ग्रामगीताचार्य गणेश धर्माळे यांनी सामुदायिक प्रार्थनेत मांडवा येथे केले. श्री. गुरुदेव सेवा मंडळ श्रीरामपूर वतीने पुसद तालुक्यात विविध ठिकाणी सर्वधर्मीय सामुदायिक प्रार्थना व भजन संध्या उपक्रमास उस्फुर्त प्रतिसाद मिळत असून यावेळी श्री समर्थ नागोजी महाराज संस्थान मांडवा येथे सामुदायिक प्रार्थना घेण्यात आली.यावेळी ह.भ.प.भगवान आबाळे, ह.भ.प.ईश्वर बोक्षे, ह.भ.प.शिवाजी आबाळे,ह.भ.प. सुधाकर कपटे, पुजारी पिंटू महाराज,तालुका सेवाधिकारी शिवशंकर नागरे मंडळाचे मार्गदर्शक मधुकर आजमिरे खुशालराव सोनोने प्रामुख्याने उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते अधिष्ठान पूजन करून श्री. समर्थ नागोजी महाराजांच्या प्रतिमेचे व चरण पादुकांचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. भूमिका धर्माळे हिच्या आदेशानुसार शिस्तबद्ध सामुदायिक प्रार्थना घेण्यात आली.यावेळी धर्माळे पुढे म्हणाले की संतांचे चित्त मऊ निर्मळ व व्यापक असते यासाठी सर्वधर्मीय सामुदायिक प्रार्थना गावागावात आवश्यक आहे येथे जात,धर्म,पंथ,रंक,राव, सर्वांना समान अधिकार आहे संपूर्ण गावाची एकता साधून ग्रामविकास यामुळे साधला जातो यावेळी त्यांनी अधिष्ठान व प्रार्थनेची महती सांगितली.

यावेळी भजन संध्या घेण्यात आली हार्मोनियम अशोक भगत महाराज,यशवंत भगत तबला अनिल अस्वार,आनंद पैठणकर, अंकुश जाधव खंजिरी सुरेश कदम यांनी तर साथसंगत कैलास मस्के, रामदास आवळे, पुंडलिक भालेराव, गजानन धाड,पंजाब गडदे, भगवान घुगशे, श्यामराव देशमाने, राजेंद्र आबाळे, गजानन गव्हाणकर, गोवर्धन इखार,सागर केळकर, साहेबराव सरकटे, गणोबा आबाळे, कार्तिक धाड, मनोज आबाळे, शिवाजी ताबसकर, ज्ञानेश्वर आबाळे सह असंख्य स्त्री पुरूष आबालवृद्ध मोठया संख्येने उपस्थित होते. महाप्रसाद, राष्ट्रवंदना, जयघोषाने कार्यक्रमाची सांगता झाली.

दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी एक दिवसाचा पगार देण्यास काही शिक्षकांची टाळाटाळ?

सामाजिक बांधिलकीच्या आवाहनाला अपेक्षित प्रतिसाद नाही, शिक्षकांच्या भूमिकेबाबत चर्चेला उधाण

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

दुष्काळग्रस्त शेतकरी आणि संकटात सापडलेल्या ग्रामीण कुटुंबांच्या मदतीसाठी राज्य शासनाने अधिकारी व कर्मचाऱ्यांना एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीत देण्याचे आवाहन केले असताना, या आवाहनाला काही शिक्षकांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याची चर्चा शिक्षक वर्तुळात रंगू लागली आहे. सामाजिक बांधिलकी आणि संवेदनशीलतेचा संदेश देणाऱ्या शिक्षकांच्या भूमिकेबाबत यामुळे प्रश्न उपस्थित होत आहेत.

यंदा महाराष्ट्रातील अनेक भागांत पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने शेतकरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांना प्रतिकूल परिस्थितीचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने १६ ऑक्टोबर २०२६ रोजी आदेश जारी करून शासनाच्या अधीन असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना ऑक्टोबर महिन्यातील एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीत जमा करण्याचे आवाहन केले होते.

शासनाच्या आदेशानुसार, संबंधित कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतन आणि महागाई भत्त्याच्या आधारे एक दिवसाचे वेतन कपात करून मुख्यमंत्री सहाय्यता निधीत जमा करण्याची तरतूद करण्यात आली होती. या योगदानास इच्छुक नसलेल्या कर्मचाऱ्यांना शासनाने निर्धारित केलेल्या नमुन्यातील अर्ज आपल्या संबंधित विभागाकडे सादर करण्याची मुभाही देण्यात आली होती. या आवाहनाला अनेक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी प्रतिसाद देत मदतीसाठी योगदान दिले. मात्र, काही शिक्षकांकडून या योगदानाबाबत टाळाटाळ होत असल्याची चर्चा समोर येत असल्याने शिक्षकांच्या सामाजिक जबाबदारीबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

शिक्षक हा समाजाला दिशा देणारा आणि विद्यार्थ्यांमध्ये सहकार्य, त्याग, संवेदनशीलता व मानवतेची मूल्ये रुजविणारा महत्त्वाचा घटक मानला जातो. वर्गात विद्यार्थ्यांना सामाजिक जाणीव आणि संकटात इतरांना मदत करण्याचे महत्त्व शिकवणाऱ्या शिक्षकांनी प्रत्यक्ष जीवनातही अशा मूल्यांचे उदाहरण घालून द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या शेतकरी बांधवांसाठी एक दिवसाचे वेतन हे मोठे आर्थिक योगदान नसले, तरी त्यातून मिळणारा आधार आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश महत्त्वाचा ठरू शकतो. अशा परिस्थितीत मदतीचा हात पुढे करणे ही केवळ आर्थिक बाब नसून मानवतेच्या भावनेशी जोडलेली कृती असल्याचे मत व्यक्त होत आहे. शिक्षकांच्या योगदानाबाबत सुरू असलेली चर्चा ही केवळ वेतन कपातीपुरती मर्यादित न राहता सामाजिक बांधिलकी, स्वच्छेने योगदान आणि शिक्षकांच्या आदर्श भूमिकेच्या संदर्भातही महत्त्वाची ठरत आहे.

कृषी ग्राहकांना १२ तास अखंडित वीजपुरवठ्यासाठी शासन व महावितरण कटिबद्ध

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

काटोल-नरखेड विधानसभा मतदारसंघातील वीज वितरण व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत ३३/११ केव्ही डोरली भिंगारे उपकेंद्राचे लोकार्पण महसूल मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते नुकतेच पार पडले. याच वेळी येनीकोनी येथे प्रस्तावित ३३/११ केव्ही उपकेंद्राचे भूमिपूजनही त्यांच्या हस्ते करण्यात आले. या दोन्ही प्रकल्पांमुळे ग्रामीण भागातील शेतकरी, कृषी ग्राहक, उद्योजक आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळून परिसराच्या विकासाची नवी पहाट उगवेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमात बोलताना पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कृषी ग्राहकांना १२ तास अखंडित



वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी शासन आणि महावितरण पूर्ण ताकदीने प्रयत्नशील असल्याचे स्पष्ट केले. डोरली भिंगारे येथील ३३/११ केव्ही उपकेंद्राचे काम अवघ्या एका वर्षात पूर्ण केल्याबद्दल त्यांनी महावितरणच्या अधिकारी व कर्मचारीवर्गाचे मनापासून अभिनंदन केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली विद्युत विभागाने सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचे अनेक महत्त्वपूर्ण प्रकल्प हाती घेतले असून, कमी दाबाने वीजपुरवठा होणे आणि वारंवार वीज खंडित होणे यांसारख्या समस्यांतून ग्राहकांची सुटका करण्यावर भर दिला जात आहे. दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता शेती व सिंचनासाठी अखंडित विजेचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

काटोल-नरखेडचे आमदार चरणसिंग ठाकूर यांनी डोरली भिंगारे उपकेंद्राचे लोकार्पण आणि येनीकोनी उपकेंद्राचे भूमिपूजन हे मतदारसंघाच्या विकासातील महत्त्वाचे टप्पे असल्याचे सांगितले. महाराष्ट्र राज्यासोबतच संपूर्ण देशाचीही विकासाच्या दिशेने वेगवान वाटचाल सुरू असून, मजबूत पायाभूत सुविधांमुळे ग्रामीण प्रगतीला नवे बळ मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले. वीज यंत्रणेच्या सक्षमीकरणामुळे शेतकरी व नागरिकांना निश्चितच फायदा होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

संचालक (प्रकल्प) सचिन तालेवार यांनी येनीकोनी येथील ३३/११ केव्ही उपकेंद्राचे काम निर्धारित मुदतीपूर्वी पूर्ण करण्याचा विश्वास व्यक्त केला. प्रकल्पांना आवश्यक निधी वेळेत उपलब्ध करून दिल्याबद्दल मोलाचे मार्गदर्शन केल्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे विशेष आभार मानले. प्रादेशिक संचालक (प्रभारी), नागपूर परिक्षेत्र तथा मुख्य अभियंता, नागपूर परिमंडळ राजेश नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली महावितरणच्या संपूर्ण टीमने उत्कृष्ट समन्वय व कार्यक्षमतेतून लोकहिताची उल्लेखनीय कामगिरी केल्याचे त्यांनी सांगितले. तसेच शासन, महावितरण आणि कॅपिटल एजन्सी यांच्या समन्वयामुळे कामांना गती मिळाल्याचेही त्यांनी नमूद केले.

डोरली भिंगारे उपकेंद्राचे काम अवघ्या वर्षभरात पूर्ण करण्यासाठी राजेश नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजनबद्ध प्रयत्न करण्यात आले. नागपूर ग्रामीण मंडळाचे अधीक्षक अभियंता संजय वाकडे, अधीक्षक अभियंता (पायाभूत आराखडा) दिपाली माडेलवार, काटोल विभागाचे कार्यकारी अभियंता नरेंद्र कटारे व कार्यकारी अभियंता (स्थापत्य) जयंत खिरकर यांच्यासह उपविभागीय, वितरण केंद्र स्तरावरील अभियंते आणि कर्मचाऱ्यांच्या सक्रिय सहभागाने हे कार्य यशस्वी झाले.

या प्रकल्पांमुळे परिसरातील वीजपुरवठ्याची क्षमता व गुणवत्ता सुधारून कमी दाब आणि वारंवार वीज खंडित होण्याच्या तक्रारी कमी होण्यास मदत होईल. येनीकोनी उपकेंद्र कार्यान्वित झाल्यानंतर तेथील घरगुती, व्यावसायिक आणि कृषी ग्राहकांनाही दर्जेदार व स्थिर वीजपुरवठा मिळेल. या सोहळ्याला आमदार राजीव पोतदार, माजी आमदार सुधाकर कोहळे, मनोहर कुंभारे यांच्यासह विविध पदाधिकारी, महावितरणचे अधिकारी-कर्मचारी, ग्रामस्थ आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन अमित पेढेकर यांनी केले.

थोडक्यात

एकात्मता विद्यालयात संविधान दिन साजरा, संविधान जनजागृतीसाठी विद्यार्थ्यांची रॅली



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

सत्यमेव जयते शिक्षण प्रसारक मंडळ नागपूरद्वारा संचालित एकात्मता उच्च प्राथमिक विद्यालय, एकात्मता नगर, जयताळा, नागपूर येथे संविधान दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाची निर्मिती, संविधानाचे महत्त्व, नागरिकांचे मूलभूत अधिकार व कर्तव्ये, तसेच लोकशाही मूल्ये याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.भारतीय संविधान हे आपल्या देशाच्या लोकशाहीचा भक्कम आधारस्तंभ असून, प्रत्येक नागरिकाने संविधानातील मूल्यांचा आदर करून समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या तत्त्वांचे पालन करणे आवश्यक आहे, असा संदेश विद्यार्थ्यांना देण्यात आला.

संविधानाविषयी समाजात जनजागृती निर्माण व्हावी आणि नागरिकांमध्ये संविधानाबद्दल आदराची भावना रुजावी, या उद्देशाने विद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांची जनजागृती रॅली आयोजित करण्यात आली. विद्यार्थ्यांनी विविध घोषणांच्या माध्यमातून संविधानाचे महत्त्व पटवून देत परिसरातील नागरिकांमध्ये जागृती निर्माण केली. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक शरद उरकुडे, सहाय्यक शिक्षिका शुभांगी कातुरे, सुनीता गावंडे व धनश्री ठेंगेकर यांनी विशेष परिश्रम घेतले.विद्यार्थ्यांमध्ये संविधानाविषयी जागरूकता, राष्ट्रीय एकात्मता आणि लोकशाही मूल्यांची जाणीव निर्माण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत प्रेरणादायी ठरला.

जय विजय तिवारी यांची महाराष्ट्र शासनाच्या 'विशेष कार्यकारी अधिकारी' पदी नियुक्ती

दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा

भारतीय जनता युवा मोर्चा (भाजयुमो) नागपूर जिल्हा उपाध्यक्ष जय विजय तिवारी यांची महाराष्ट्र शासनाच्या वतीने 'विशेष कार्यकारी अधिकारी' या प्रतिष्ठित पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल राजकीय व सामाजिक स्तरातून त्यांचे अभिनंदन केले जात आहे. आपल्या या नियुक्तीबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना जय विजय तिवारी यांनी पक्षाच्या सर्व वरिष्ठ नेत्यांचे आणि मार्गदर्शकांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत. ते म्हणाले की, "महाराष्ट्र शासनाच्या 'विशेष कार्यकारी अधिकारी' पदी माझी नियुक्ती झाल्याबद्दल मी सर्व वरिष्ठ नेतृत्वाचा हृदयपूर्वक ऋणी आहे. या जबाबदारीच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांची सेवा करण्याचा माझा प्रामाणिक प्रयत्न राहील."



या नियुक्तीबद्दल त्यांनी राज्याचे राज्यमंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे, सावनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. आशिषबाबू देशमुख, विधान परिषद सदस्य डॉ. राजीव पोद्दार, भाजप नागपूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष मनोहर कुंभारे, जिल्हा उपाध्यक्ष किशोर चौधरी, बबलू भैया ठाकूर, भाजयुमो नागपूर जिल्हाध्यक्ष अनिकेत आतुरकर, जिल्हा महामंत्री शितलजी, भाजप खापरखेडा शहर अध्यक्ष श्रीरामजी डाकरे तसेच भारतीय जनता पार्टीचे सर्व वरिष्ठ पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे मनापासून आभार मानले आहेत.

आक्रमण युवक संघटनेतर्फे संविधान दिवस उत्साहात साजरा



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधून आक्रमण युवक संघटनेच्या नागपूर शाखेतर्फे आज जाटतरोडी चौक येथे संविधान दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच उपस्थित कार्यकर्त्यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून संविधानाप्रती आदर आणि निष्ठा व्यक्त केली. भारतीय संविधानाने देशातील प्रत्येक नागरिकाला समानता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुतेचा अधिकार प्रदान केला आहे. संविधानातील मूल्यांचा आदर राखत सामाजिक एकता, समता आणि लोकशाही बळकट करण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करताना उपस्थित कार्यकर्त्यांनी संविधानातील मूल्ये आपल्या जीवनात आचरणात आणण्याचा संकल्प व्यक्त केला.

कार्यक्रमा दरम्यान भारतीय संविधान चिरायू हो, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. संविधान दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना उजाळा देत संविधानाच्या महत्त्वाबाबत जनजागृती करण्यात आली. आज २६ नोव्हेंबर २०२६ संविधान हा दिवस केवळ संविधानाच्या स्वीकाराची आठवण करून देणारा नसून, संविधानाने दिलेल्या अधिकारांचा आदर करणे, सामाजिक समता प्रस्थापित करणे, बंधुता वाढवणे आणि लोकशाही मजबूत करण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाने स्वीकारण्याचा दिवस आहे. या कार्यक्रमाला ओपूल तामगाडगे, सूरज पुराणिक, अतिश शंभरकर, अश्विन पाटील, प्रफुल खोब्रागडे, दीपक पाटील, दर्शन तामगाडगे, संजय भाऊ शेंडे, राजुभाऊ मेश्राम, जुगनू भाऊ डोंगरे, अतिश बनकर, एकनाथ भाऊ आदी कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यकर्त्यांच्या सामूहिक सहभागातून संविधान दिनाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

हैदराबाद येथील इंडियन रोड्स काँग्रेसच्या अधिवेशनात जनआक्रोशचा रस्ते सुरक्षेचा जागर

जनआक्रोशच्या स्टॉलला २०० हून अधिक प्रतिनिधींची भेट

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

इंडियन रोड्स काँग्रेसचे ८५ वे वार्षिक अधिवेशन १९ ते २२ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत हैदराबाद येथील हायटेक्स एक्झिबिशन सेंटरमध्ये पार पडले. या राष्ट्रीय अधिवेशनात नागपूरच्या जनआक्रोश संस्थेने रस्ते सुरक्षेविषयी जनजागृती केली.

या अधिवेशनात जनआक्रोशचे सुबोध देशपांडे, ज्ञानेश पाहुणे, दत्तात्रय कुलकर्णी आणि विनोद गुरवे यांनी सहभाग नोंदविला. सुबोध देशपांडे यांनी 'रस्ते अपघात : कारणे व प्रतिबंधात्मक उपाययोजना' या विषयावर सचिव सादरीकरण केले. त्यांच्या सादरीकरणाला उपस्थित प्रतिनिधींकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



इंडियन रोड काँग्रेसकडून जनआक्रोश संस्थेला गेल्या पाच वर्षांपासून विशेष निमंत्रण दिले जात आहे. नागपूर, लखनऊ, अहमदाबाद, भुवनेश्वर या शहरांमधील वार्षिक अधिवेशनांमध्ये जनआक्रोश संस्थेने नियमितपणे सहभागी होत रस्ते अपघातांविषयी जनजागृती केली आहे.

मागील चार वार्षिक अधिवेशनांच्या स्मरणिकांमध्ये जनआक्रोशचे ज्येष्ठ मार्गदर्शक डॉ. अशोक करंदीकर यांचे रस्ते अपघातविषयक लेख प्रसिद्ध झाले आहेत. २०२६ च्या अधिवेशनाच्या स्मरणिकेत 'डिकंजेशन ऑफ सिटी रोड्स - ऑप्शन्सः अ केस स्टडी ऑफ नागपूर' या विषयावरील त्यांचा लेख प्रसिद्ध झाला असून, त्याचेही कौतुक होत आहे. या अधिवेशनात जनआक्रोशचा स्टॉलदेखील लावण्यात आला. चार दिवसांत विविध क्षेत्रांतील २०० हून अधिक प्रतिनिधींनी या स्टॉलला भेट देऊन संस्थेच्या कार्याची माहिती घेतली. गेल्या १४ वर्षांपासून संस्थेने केलेल्या जनजागृतीपर कार्याचे त्यांनी कौतुक केले.



केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, तेलंगणाचे मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी, रस्ते व इमारती मंत्री कोमाटिरेड्डी वेंकट रेड्डी यांच्या उपस्थितीत या अधिवेशनाचे उद्घाटन झाले. रस्ते व महामार्ग क्षेत्रातील अभियंते, शासकीय अधिकारी, संशोधक, कंत्राटदार आणि तज्ज्ञांसाठी आयोजित या महत्त्वपूर्ण राष्ट्रीय अधिवेशनात ३ हजारांहून अधिक प्रतिनिधींनी सहभाग नोंदविला.

श्री निकेतन महाविद्यालयात संविधान दिवस उत्साहात साजरा

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

श्री निकेतन आर्ट्स कॉमर्स कॉलेज, नागपूर येथील राज्यशास्त्र विभागांतर्गत संविधान दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.मेधा कानेटकर यांनी भूषविले. या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. राजेंद्र मालोकर व्यासपीठावर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन राज्यशास्त्र विभागाचे प्रा. राजेश कनिरे यांनी केले.



व्यासपीठावरील उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करण्यात आले. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. मेधा कानेटकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाची शपथ देण्यात आली. संविधान दिनाचे औचित्य साधून संविधान जन जागृती रॅली काढण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. राजेश कनिरे यांनी केले. या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. हा कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता विद्यार्थी, प्राध्यापक आणि कार्यालयीन कर्मचारी वर्ग यांचे मोलाचे सहकार्य व योगदान लाभले.

जयस्वाल महाविद्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा

इयत्ता पाचवीतील अमेय शेंडे याने साकारली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची वेशभूषा; विविध स्पर्धांचे आयोजन



दै. सिंहवाणी वृत्त, काचुरवाही

भारतीय संविधानाचे महत्त्व, लोकशाही मूल्ये आणि नागरिकांच्या हक्क व कर्तव्यांची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी, या उद्देशाने गुरुवार, दिनांक २६ नोव्हेंबर रोजी स्व. अँड. नंदकिशोर जयस्वाल माध्यमिक विद्यालय व कला कनिष्ठ महाविद्यालय, काचुरवाही येथे संविधान दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून करण्यात आली. विद्यालयाच्या नवनियुक्त मुख्याध्यापिका माया पद्माकर मुसळे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करण्यात आले. यावेळी उपस्थित शिक्षकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले.

संविधान दिनानिमित्त विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा व रांगोळी स्पर्धा अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विशेष आकर्षण म्हणजे इयत्ता पाचवीतील विद्यार्थी अमेय सचिन शेंडे याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची वेशभूषा साकारून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. त्याच्या या सादरीकरणातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आणि कार्याचा संदेश देण्यात आला.

याप्रसंगी नवनियुक्त मुख्याध्यापिका माया मुसळे व वरिष्ठ शिक्षक संजय बोन्द्रे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी २६ नोव्हेंबर या संविधान दिनाचे ऐतिहासिक महत्त्व विशद करताना भारतीय संविधानाची निर्मिती, संविधानाने नागरिकांना दिलेले मूलभूत अधिकार, कर्तव्ये तसेच स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या लोकशाही मूल्यांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. प्रत्येक विद्यार्थ्याने संविधानाचा आदर करून एक जबाबदार व जागरूक नागरिक बनावे, असे आवाहनही त्यांनी केले. या कार्यक्रमाला मुख्याध्यापिका माया पद्माकर मुसळे, वरिष्ठ शिक्षक संजय बोन्द्रे, देवराव धुर्वे, भारत भोवते, जीवन राऊत, प्रगती अडकणे, प्रा. फारुख शेख, विक्रम गजभिये, अंजली चकोले, पंढरी कडू, सुप्रिया गजभिये आदी शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

गोवारी युवकांनी स्वावलंबनातून स्वयंरोजगार उभारावा : ज्ञानेश्वर रक्षक



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

शिक्षणाच्या डिग्रीतून रोजगार मिळतो हा गैरसमज आहे. शिक्षणामुळे व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते. रोजगाराच्या संधी शासकीय स्तरावर संपत आल्या आहेत. गोवारी युवकांनी स्वावलंबनातून स्वयंरोजगार उभा करून अनेकांना रोजगार देणारे बनावे, असे कळकळीचे आवाहन श्रीगुरुदेव युवामंचाचे प्रवर्तक ज्ञानेश्वर रक्षक यांनी केले.

गोवारी स्मारक परिसरात आयोजित श्रद्धांजली कार्यक्रमात ते बोलत होते. ते पुढे म्हणाले, गोवारी समाज कष्टकरी आहे. आपल्या कष्टकरी आई-वडिलांना सुखाचे दिवस दिसावेत यासाठी प्रयत्न करा. वाईट व्यसनांच्या आहारी जाऊ नका, स्वतःमध्ये वाचनाची आवड निर्माण करा. अभ्यासासोबतच संत-महापुरुषांच्या जीवनकार्यातून प्रेरणा घ्या, सर्वांचे जीवन सुखी होईल. हीच खरी ११४ आदिवासी गोवारी शहिदांना श्रद्धांजली ठरेल.

श्रीगुरुदेव सेवा मंडळ दक्षिण नागपूर चे सेवाधिकारी श्री चंद्रभानजी राऊत दादा यांच्या परीवारातील तसेच गुरुदेव सेवा मंडळाच्या पुढाकाराने आयोजित कार्यक्रमात गोवारी समाजाच्या हक्काच्या मागण्यांसाठी११४ आदिवासी गोवारी शहीद झालेल्यांना हुतात्म्यांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज रचित विश्वशांती आणि मानवी कल्याणाच्या सामुदायिक प्रार्थनेतून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. मौन श्रद्धांजली कार्यक्रमाला मोठ्या संख्येने गोवारी समाजातील जनसमुदाय उपस्थित होता.मौन आदरांजली कार्यक्रमाला उपस्थित शांतारामजी राऊत, वैभव राऊत, निशांत राऊत, पारस राऊत, कांताताई राऊत अध्यक्ष गुरुकुंज निधी चंद्रकला नेव्हारे, सविताताई राऊत. माजी सरपंच सोनवाने दादा यांच्या उपस्थित कार्यक्रम सपन्न झाला.

श्री गुरुदेव सेवा मंडळाने शहिदांना सामुदायिक प्रार्थनेने वाहिली श्रद्धांजली

धामण सर्पाने उडवली खळबळ, प्रशासनाच्या नाकर्तेपणाविरोधात संतापाची लाट

पंचायत समिती तुमसर परिसरात झुडपी जंगलाचे साम्राज्य, कर्मचाऱ्यांच्या जीवाशी खेळ सुरू

दै. सिंहवाणी वृत्त, तुमसर

पंचायत समिती तुमसर येथील एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालयात तब्बल सहा फूट लांबीचा महाकाय धामण सर्प शिरल्याने कर्मचाऱ्यांसह नागरिकांची एकच तारांबळ उडाली. सुदैवाने सर्पमित्रांच्या तत्परतेमुळे अनर्थ टळला असला, तरी प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराविरोधात आता कर्मचारी व नागरिकांतून तीव्र संताप व्यक्त होत आहे. "आमच्या जीवाचे काही बरेवाईट झाल्यास जबाबदार कोण?" असा संतप्त सवाल कर्मचाऱ्यांनी उपस्थित केला आहे.



कार्यालयात शिरला सहा फुटी धामण सर्प

मिळालेल्या माहितीनुसार, तुमसर पंचायत समितीच्या एकात्मिक बाल विकास कार्यालयात अचानक सहा फुटी धामण सर्प आल्याचे निदर्शनास येताच कार्यालयातील कर्मचाऱ्यांमध्ये घबराट पसरली. कामाच्या वेळेतच हा प्रकार घडल्याने परिसरातील नागरिकही मोठ्या संख्येने जमा झाले होते. घाबरलेल्या कर्मचाऱ्यांनी तात्काळ सर्पमित्र संघटनेशी संपर्क साधला.

सर्पमित्रांचे धाडसी रेस्क्यू ऑपरेशन

घटनेची माहिती मिळताच सर्पमित्र संघटनेचे दुर्गेश मालाधरे, चेतन देशमुख आणि मोहित देशमुख यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. कार्यालयातील परिस्थिती नियंत्रणात आणत त्यांनी अत्यंत शिताफीने व बराच वेळ परिश्रम घेऊन या सहा फुटी महाकाय धामणाला सुरक्षितपणे पकडले. सापांना पकडल्यानंतर कर्मचारी व नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

परिसराला झुडपी जंगलाचा विळखा; प्रशासन कुंभकर्णी झोपेत

पंचायत समितीच्या संपूर्ण परिसरात सध्या मोठ्या प्रमाणात झुडपी जंगल वाढले आहे. या वाढलेल्या झुडपांमुळेच गेल्या अनेक दिवसांपासून कार्यालयाच्या आत विषारी व बिनविषारी सर्प शिरण्याच्या घटना वारंवार घडत असल्याचे कर्मचाऱ्यांनी सांगितले. सातत्याने होणाऱ्या या घटनांमुळे कार्यालयात काम करणे कठीण झाले असून जीवितहानीची भीती निर्माण झाली आहे. प्रशासनाने या प्रकाराची तातडीने व गंभीर दखल घेऊन पंचायत समिती परिसरातील झुडपी जंगल त्वरित काढावे आणि परिसर स्वच्छ करावा, अशी जोरदार मागणी कर्मचारी व नागरिकांकडून होत आहे. आता प्रशासन कधी जागे होणार आणि तातडीने कारवाई करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

भारतीय संविधान जगात सर्वश्रेष्ठ; प्रत्येकाने संविधानाचे पालन करावे : जिल्हाधिकारी

संविधान दिन उत्साहात साजरा







दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

भारतीय संविधानाने देशातील प्रत्येक नागरिकाला मूलभूत हक्क, कर्तव्ये आणि अधिकार प्रदान केले असून, संविधानाचे पालन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. जगातील प्रत्येक देशाचे स्वतःचे संविधान आहे. मात्र सर्व देशांच्या संविधानांमध्ये भारताचे संविधान सर्वश्रेष्ठ आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेल्या महान संविधानाच्या गौरवशाली परंपरेचे स्मरण करण्यासाठी संविधान दिनानिमित्त २६ नोव्हेंबर रोजी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद उद्घाटनपर भाषणात बोलत होते. ते पुढे म्हणाले की, भारतीय संविधानामध्ये अशी कोणतीही घटना किंवा परिस्थिती नाही ज्याबद्दल विचार करण्यात आलेला नाही. आज जग बदलत असून अनेक मोठमोठी संकटे समोर येत आहेत. मात्र देशात कोणतीही कठीण परिस्थिती निर्माण झाली तरी त्यावर मात करण्याचे मार्ग संविधानात आहेत. संविधानाने प्रत्येक व्यक्तीला हक्क आणि कर्तव्ये दिली आहेत. या हक्कांचे आणि अधिकारांचे पूर्णपणे पालन करून संविधानाचे संरक्षण करणे आवश्यक आहे. प्रत्येक नागरिकाने संविधानाचे प्रामाणिकपणे पालन केल्यास देश अधिक सुरक्षित आणि सक्षम होईल.

कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी कमलकिशोर फुटाणे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठानचे व्यवस्थापकीय संचालक सुरेंद्र पवार, समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त प्रसाद कुळकर्णी, इतर मागास व बहुजन कल्याण विभागाचे प्रादेशिक उपसंचालक विजय वाकुलकर, जिल्हा जात पडताळणी समितीचे उपायुक्त मंगेश वानखेडे, सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुखदेव कोरटी, विशेष अधिकारी नंदकिशोर भुडके आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांनी केले तर संचालन शीतल गडलिंग यांनी केले. गृहपाल सुजाता रामटेके, क्रिस्टल कंपनीचे विभागीय व्यवस्थापक ईश्वर चंदनशिव तसेच घरकुल योजनेतील लाभार्थी रोहित नाडे, मिठठू भादुशाव लोंढे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समाज कल्याण कार्यालयातील वरिष्ठ समाज कल्याण निरिक्षक अवनी वेखंडे, कार्यालय अधिक्षक प्रफुल गोहते, समाज कल्याण निरिक्षक दिक्षा रामटेके, समिक्षा दुधलकर, किरण लामसोगे, पवन अहिरकर, पराग वासनिकर, जितेंद्र सातपुते, निकिता भुते, विशाल कळमकर, मंगला दुधनकर, प्रिती नुन्हारे, मीनल लांजेवार, सतीश डोबले, दिवाकर बदन, सुयोग पडारे, विजय वाकोडीकर, राजेंद्र अवधुत, तुषार अडागडे, प्रविण वाकडे, सुजल भरणे, सरीता धोबे, श्रीकांत मून, पुर्वा मेश्राम, विजय लोणकर, सचिन रुईकर, अभिषेक नुन्हारे, योगेश परदेसी, माया गजभाटे यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी या कार्यक्रमास सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, ज्येष्ठ नागरिक, व्यसनमुक्ती केंद्रांचे प्रतिनिधी, दिव्यांग शाळा व कार्यशाळांचे प्रतिनिधी, शासकीय वसतिगृहे, शासकीय निवासी शाळांचे विद्यार्थी, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालय, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, तृतीयपंथीय समुदायाचे प्रतिनिधी, ज्येष्ठ नागरिक, विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व प्रतिनिधी, बार्टी कार्यालय तसेच विविध महामंडळांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संविधान प्रास्ताविकेचे वाचन करून येसंबा येथे संविधान दिन साजरा

दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा : येसंबा ग्रा पं कार्यालयात उपस्थित मान्यवरांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोला माल्यार्पण,पूजा अर्चना व संविधान प्रास्ताविकेचे वाचन करून संविधान दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी उपसरपंच धनराज हारोडे,ग्रामविकास अधिकारी विनोद तागडे, पोलीस पाटील नरेंद्र राऊत,ग्रा. पं सदस्य रेवती डडुरे, अंगणवाडी सेविका माया चकोले, आशा वर्कर सुषमा गजभिये, मदतनीस कांता गजभिये, अलका हारोडे, अरूणा बांगडे, निर्मला वानखेडे, ऑपरेटर मिनाक्षी कारोंडे, अंगणवाडीतील विद्यार्थी उपस्थित होते.



अवघ्या काही क्षणांत होत्याचे नव्हते : ट्रकखाली पानठेला, महिला आणि ग्राहक बचावले!



दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर -धनंजय पांडरे

भरधाव वेगाने जाणाऱ्या ट्रकवरील चालकाचे वळणावर नियंत्रण सुटल्याने ट्रक डिव्हायडर ओलांडून दुसऱ्या बाजूला पलटी झाला. या भीषण अपघातात कार, दोन स्कूटी आणि पानठेल्याचे मोठे नुकसान झाले. विशेष म्हणजे, ट्रक पानठेल्यावर पलटी होत असताना तेथे उपस्थित असलेली महिला आणि एक ग्राहक थोडक्यात बचावले. ही घटना गुरुवारी सायंकाळी ४.३० वाजताच्या सुमारास फुटली दीवार वळणाजवळ घडली.एमएच ०४ एमआर ५६३२ क्रमांकाचा ट्रक आंध्र प्रदेशातून जम्मू-काश्मीरकडे जात होता. भरधाव वेगात असताना वळणावर चालकाचे नियंत्रण सुटले. त्यामुळे ट्रक डिव्हायडर ओलांडून दुसऱ्या बाजूला जाऊन पलटी झाला. या अपघातात एमएच ३४ सीडी ५८०९ क्रमांकाची कार, एमएच ३४ सीव्ही ५३५० क्रमांकाची स्कूटी, पानठेला आणि एका ग्राहकाची स्कूटी ट्रकखाली दबली.

अपघतावेळी पानठेल्यात दीपा अक्षय रामटेके ही महिला उपस्थित होती. तसेच एक ग्राहकही तेथे होता. अचानक ट्रक पानठेल्यावर पलटी झाल्याने दोघेही संकटात सापडले; मात्र सुदैवाने दोघांनीही या अपघातातून थोडक्यात बचाव केला. ट्रकचालक जयसिंह ज्ञानसिंह बघेल (वय ५०), रा. मिर्झापूर, उत्तर प्रदेश यालाही किरकोळ दुखापत झाली. भरधाव वेग आणि वळणावर चालकाचे सुटलेले नियंत्रण यामुळे हा अपघात घडल्याचे सांगण्यात येत आहे. अपघातात वाहनांचे आणि पानठेल्याचे मोठे नुकसान झाले. मात्र, पानठेल्यातील महिला आणि ग्राहक सुखरूप बचावल्याने परिसरातील नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

संविधानाची मूल्ये जपणे हीच लोकशाहीची खरी ताकद : डॉ. अजय चिकाटे

विदर्भ साहित्य संघात संविधान दिन साजरा



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

भारतीय संविधान केवळ कायद्याची चौकट नसून देशातील विविध जाती, धर्म आणि प्रांतांमध्ये विखुरलेल्या समाजाला 'आम्ही भारतीय लोक' ही सामूहिक ओळख देणारे आणि नागरिकांना सार्वभौम शक्ती प्रदान करणारे साधन आहे. संविधानाची मूल्ये केवळ कागदावर न राहता प्रत्येक नागरिकाच्या मनापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन आंबेडकरी विचारांचे अभ्यासक डॉ. अजय चिकाटे यांनी केले.

विदर्भ साहित्य संघाच्या वतीने संविधान दिनानिमित्त ग्रंथसहवास येथे आयोजित विशेष व्याख्यानात 'संवैधानिक मूल्ये आणि आपण' या विषयावर डॉ. अजय चिकाटे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी होते. यावेळी सरचिटणीस विलास मानेकर, उपाध्यक्ष बाळ कुलकर्णी, अनिल इंदाणे, डॉ. पराग घोंगे, अमर कुलकर्णी आणि डॉ. पुरण मेश्राम यांची उपस्थिती होती. संविधान निर्मितीची प्रक्रिया, मसुदा समितीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अहोरात्र कष्ट, उद्देशिकेतील स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही मूल्ये, मूलभूत हक्क तसेच नागरिकांचा कर्तव्यांचे महत्त्व डॉ. चिकाटे यांनी अधोरेखित केले. संविधानाची मूळ चौकट मजबूत असली तरी त्यातील मूल्ये दैनंदिन व्यवहारात जपून तळागाळापर्यंत पोहोचवणे ही प्रत्येक सुजाण नागरिकाची जबाबदारी असल्याचे आवाहन त्यांनी केले.

डॉ. गिरीश गांधी यांनी संविधान दिनाच्या शुभेच्छा देताना धर्माच्या नावाखाली देशाची फाळणी झाली असतानाही विविध धर्म, पंथ आणि जाती-उपजातींनी विखुरलेल्या भारताला एका सूत्रात बांधून ठेवण्याची ताकद संविधानात असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ स्वाती मोहरीर यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. मोनाली पोफळे यांनी केले.

रामटेकमध्ये प्रथमच भव्य केसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन

कोल्हापूर, पुणे, नागपूरसह परिसरातील नामवंत मल्लांचा सहभाग; पैलवान विजय वारा यांना प्रथम पारितोष



दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

त्रिपुरी पौर्णिमेच्या निमित्ताने रामटेक शहरातील नेहरू मैदानावर २४ नोव्हेंबर रोजी परमात्मा एक बहुउद्देशीय तालीम संघ, रामटेक यांच्या वतीने प्रथमच भव्य रामटेक केसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत कोल्हापूर, पुणे, नागपूर तसेच रामटेक परिसरातील नामवंत पैलवानांनी सहभाग घेतला. विविध वजनगटांतील चुरशीच्या लढतींनी उपस्थित कुस्तीशौकिनांची मने जिंकली. स्पर्धेतील प्रथम पारितोषिक श्रेयस जयस्वाल यांच्या हस्ते पैलवान विजय वारा यांना प्रदान करण्यात आले.

याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अजित पवार गट) प्रदेश उपाध्यक्ष तथा पर्यटक मित्र चंद्रपाल चौकसे, विजय हटवार, भाजपचे नागपूर जिल्हा उपाध्यक्ष उदयसिंग उर्फ गज्जू यादव, नगराध्यक्ष तथा कार्यक्रमाचे सहउद्घाटक बिकेंद्र महाजन, माजी जिल्हा परिषद सदस्य नरेश धोपटे, देवारामजी भोयर, महाराष्ट्र कुस्ती संघाचे उपाध्यक्ष गणेश कोहळे, नामदेव राठोड, गोपीजी कोल्हेपरा, सुभाषजी नागपुरे, रवींद्र तांदूळकर, चंद्रकांत (पिंटू) नंदनवार आणि सुरजितसिंग चिंटोले यांची विशेष उपस्थिती होती. स्पर्धेच्या यशस्वितेसाठी मुख्य आयोजक नरेश मसुरके, अजय खेडगरकर, जितेंद्र वलोकर, नितेश पडोळे, नाना उराडे, कार्तिक उराडे, आकाश बांगडकर, अमोल मोहरे, राजेंद्र नागपुरे, किशोर उदगीलवार, तुळशीराम चौधरी, वामन बांते आणि राजेश वाघाडे यांनी परिश्रम घेतले. स्पर्धेला नागरिक व कुस्तीप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

रस्ता फुटपाथवरील अनधिकृतपणे लावण्यात आलेले दुकानांवर कारवाई

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर : नागपूर महानगरपालिका धरमपेठ झोन क्र. ०२, अंतर्गत नागपूर शहर पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने मेयो हॉस्पीटल चौक ते अग्रेसन चौक ते नंगा पुतला चौक आणि संपूर्ण महल परिसर येथे धरमपेठ झोन क्र. २, केंद्रीय अतिक्रमण पथक यांनी गांधीबाग झोन अंतर्गत, रस्ता फुटपाथवरील अनधिकृतपणे लावण्यात आलेले दुकानांवर संयुक्तीक कारवाई करण्यात आली.

बॅनर लावताना विद्युत करंट लागून तरूण मजुराचा दुर्दैवी मृत्यू

विद्युत डिपीच्य खांबावर लावत होता बॅनर ठेकेदारावर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्याची मनसेची मागणी

दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा धर्मेंद्र शेरकुरे

वरोरा शहरातील शहीद योगेश डाहुले चौक येथील जाजू हॉस्पिटल समोरील डीपीच्या खांबावर बॅनर लावण्याचे काम चालू असताना अचानक करंट लागल्याने एका इसमाचा मृत्यू झाला. हि घटना दिनांक २४ ला सायंकाळी घडली.

चिमूर तालुक्यातील सोनेगाव (बेगडे)येथील संदीप ज्ञानेश्वर गुळधे वय २६ याचा बॅनर लावण्याचे काम सुरू असताना अचानक करंट लागल्याने तो खाली सिमेंट रोडवर कोसळला त्यातच त्याचा जागीच मृत्यू झाला. यामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

सविस्तर वृत्त असे की, संदीप गुळधे हा गेडेकर नामक ठेकेदाराकडे मजूर म्हणून काम करत होता शहिद योगेश डाहुले चौक येथील जाजू हास्पिटल समोरील मुख्य विद्युत डीपीच्या खांबावर बॅनर लावण्यासाठी त्याला वर चढवण्यात आले होते मात्र काम सुरू असताना त्याच्याकडे सेफ्टी बेल्ट अथवा इतर कोणतेही सुरक्षेची साधने उपलब्ध नव्हती अत्यंत धोकादायक आणि बेकायदेशीर पद्धतीने विद्युत खांबावर चढवण्यात आल्याने संदीपला शॉक लागून तो थेट खाली कोसळला या भीषण दुर्घटनेत त्याचा जागीच मृत्यू झाला या घटनेनंतर अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहे. वर्दळीच्या चौकात आणि थेट विद्युत डीपीच्या खांबावर बॅनर लावण्यासाठी नगरपरिषद अथवा संबंधित विभागाची परवानगी घेण्यात आली होती का? बॅनर ज्याचे होते त्याच्या ठेकेदारादरम्यान कोणता करारनामा झाला होता? का तसेच या गंभीर प्रकारानंतर वरोरा नगरपरिषद आणि महावितरण नेमकी काय कारवाई करणार? असा सवाल नागरिकाकडून विचारला जात आहे.

कामगाराच्या मृत्यूनंतर ही अद्याप संबंधित ठेकेदारावर कोणताही गुन्हा दाखल करण्यात आलेला नसल्यामुळे पोलिसांच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला जात आहे. या प्रकरणामागे प्रभावशाली व्यक्तीचा वरदहस्त असल्याची चर्चा असून कोणाच्यातरी दबावाखाली गुन्हा नोंदवण्यास टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप जोर धरू लागला आहे. मजुरांच्या सुरक्षेचा विचार न करता त्यांच्या जीवाची खेळणाऱ्या ठेकेदार गेडेकर यांच्यावर तात्काळ सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा या संपूर्ण प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करावी मृतकांच्या कुटुंबाला आर्थिक मदत देण्यात यावी अशी मागणी मनसेचे वाहतूक सेना तालुकाध्यक्ष बाळू गेडाम यांनी केली आहे.

मनसेचे बाळू गेडाम यांनी नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना संदीप गुळधे यांच्या मृत्यूप्रकरणी धारेवर धरले तसेच वरोरा शहरातील मुख्य रोडवरील परवानगी न घेता विद्युत खांबावर बॅनर लावण्याचे काम सर्रासपणे चालू होते बॅनर मुळे दुचाकी चालकांचे लक्ष विचलित होत असल्याने चौकात किरकोळ अपघात वाढले होते. बाळू गेडाम यांनी याबाबत जाब विचारल्यामुळे वरोरा शहरातील नगरपालिकेने बॅनर हटवण्याचे काम हाती घेतले व शहरातील मुख्य चौक बाजारपेठ येथील बॅनर हटवण्यात आले आहे.

थोडक्यात

साई इंटरनॅशनल, रामटेक येथे संविधान दिन साजरा

दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

रामटेक येथील विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांनी शाळेच्या संमेलनात संविधान दिन साजरा केला. विद्यार्थ्यांनी संविधानाची प्रस्तावना सादर केली आणि आपल्या राष्ट्रासाठी संविधानाचे महत्त्व अधोरेखित केले. प्राचार्य डॉ. महेश नदिकर यांनी विद्यार्थ्यांना विविध उपक्रमांविषयी मार्गदर्शन केले, ज्यात ते सक्रियपणे सहभागी होऊ शकतात. शैक्षणिक संचालक राजेंद्र मिश्रा यांनी शाळेच्या प्रवासाचे कौतुक केले आणि सर्व सहभागींना शुभेच्छा दिल्या. शाळेचे अध्यक्ष डॉ. व्ही. बी. नागपुरे यांनी संविधान दिनानिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या.

संविधान दिनानिमित्त रामटेकमध्ये भव्य रॅली; संविधानाच्या मूल्यांचा दिला संदेश



दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

भारतीय संविधान दिनानिमित्त रामटेक शहरात उत्साहपूर्ण वातावरणात भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून रॅलीला सुरुवात होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे तिचा समारोप करण्यात आला. या रॅलीमध्ये नागरिक, युवक, सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. रॅलीदरम्यान भारतीय संविधानाचा जयघोष करण्यात आला. संविधानाचे महत्त्व, लोकशाही मूल्ये, सामाजिक समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूलभूत तत्त्वांविषयी जनजागृती करण्यात आली. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय संविधान सभेने संविधानाचा स्वीकार केला. त्यामुळे हा दिवस प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा आणि ऐतिहासिक महत्त्वाचा आहे. भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेले संविधान हे प्रत्येक नागरिकाला समान अधिकार, न्याय आणि सन्मान देणारे महान मार्गदर्शक आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचा विचार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला समता, स्वातंत्र्य व बंधुतेचा संदेश यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून समाजात एकता, सामाजिक सलोखा आणि संविधानिक मूल्यांची जपणूक करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. रॅलीच्या माध्यमातून नागरिकांमध्ये संविधानाविषयी जागरूकता निर्माण करण्यासोबतच लोकशाही अधिक सक्षम करण्याचा संदेश देण्यात आला. संविधानातील अधिकारांसोबतच प्रत्येक नागरिकाने आपल्या कर्तव्यांची जाणीव ठेवून देशाच्या प्रगतीत योगदान द्यावे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.त्यावेळी रजत गजभिये नगरसेवक, मनीष खोब्रागडे, प्रेस ठवरे, जोहरे गुरुजी,अमित अंबादे, भारती गजभिये, दीपा चव्हाण, शोभा राऊत, उज्वला धामगये, दुडे ताई, व इतर सर्व मान्यवर उपस्थित होते. तसेच संविधानाचा सन्मान, लोकशाहीचे रक्षण आणि समतेच्या विचारांचा प्रसार हाच संविधान दिनाचा खरा उद्देश असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

शब्दवेली
साहित्य विशेष
दैनिक सिंहवाणी वृत्त
७ दिनांक : शुक्रवार, २७ नोव्हेंबर २०२६
Mail Id : sinhvanivrutta@gmail.com
Epaper : epaper.sinhvani.com

रील्सचे व्यसन आणि डिजिटल भरकटलेपण : तरुणांमध्ये का वाढतोय राग, अस्वस्थता आणि एकटेपणा?

प्रोफेसर डॉ. जयंत कुमार विवेकानंद रामटेके

आज आपल्याकडे मागील पिढीच्या तुलनेत कितीतरी अधिक भौतिक सुविधा, वेगवान इंटरनेट आणि आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध आहे. असे असूनही, एक शारीरिक शिक्षक आणि आरोग्य संशोधक म्हणून जेव्हा मी महाविद्यालयीन परिसरापासून ते रस्ते आणि कुटुंबांपर्यंत नजर टाकतो, तेव्हा एक विचित्र अस्वस्थता, क्षुल्लक कारणावरून भडकणारा राग आणि संवादहीन एकटेपणा स्पष्टपणे जाणवतो. कधी नागपूर किंवा कोणत्याही शहरातील ट्रॅफिक सिग्नलवर अवघ्या दोन सेकंदांच्या विलंबावरून लोक एकमेकांच्या जीवावर उठतात, तर कधी एकाच छताखाली बसलेले कुटुंबातील चार सदस्य चार वेगवेगळ्या मोबाईल स्क्रीनमध्ये हरवलेले दिसतात. हा कोणताही योगायोग नाही; आपल्या बदलत्या डिजिटल सवयींनी आपल्या मेंदू आणि शरीराचा जैविक ताळमेळ पूर्णपणे विस्कळीत केला आहे.

१. रील्स स्क्रोलिंग आणि मेंदूचा 'कॉग्निटिव्ह ओव्हरलोड'

एक खेळाडू जेव्हा मैदानावर उतरतो, तेव्हा त्याला संपूर्ण वेळ चेंडू आणि आपल्या रणनीतीवर एकाग्र राहावे लागते. कोणतेही मोठे ध्येय गाठण्यासाठी किंवा कौशल्य शिकण्यासाठी मेंदूला दीर्घकाळ एकाच अवस्थेत स्थिर राहण्याची गरज असते. परंतु, स्मार्टफोनवर रील्स पाहण्याची सवय नेमकी याच्या उलट कार्य करते. दर १५ ते ३० सेकंदांत स्क्रीन स्वाइप करताच एक पूर्णपणे नवीन विषय समोर येतो, कधी कोणाच्या लग्नातील नृत्य, पुढच्याच क्षणी एखादी दुःखद बातमी, तर लगेच एखादा विनोद.

मानवी मेंदूची उत्क्रांती इतक्या वेगवान गतीने विषय बदलण्यासाठी झालेली नाही. जेव्हा आपण सतत स्क्रोल करत राहतो, तेव्हा मेंदू दर काही सेकंदांत नवीन संदर्भ समजून घेण्याचा प्रयत्न करतो आणि शेवटी थकून काम करणे थांबवतो. यामुळे तरुणांची एकाग्रता आणि सखोल विचार करण्याची क्षमता कमकुवत होत चालली आहे.

२. 'प्रीफ्रंटल कॉर्टेक्स' विरुद्ध 'अमिग्डाला': रागाचे विज्ञान

आपल्या मेंदूचे दोन प्रमुख भाग आपले वर्तन नियंत्रित करतात. पहिला म्हणजे 'प्रीफ्रंटल कॉर्टेक्स', जो आपल्याला संयम, तर्क आणि शांततेने परिस्थितीचा विचार करून योग्य प्रतिसाद देण्याची शक्ती देतो. दुसरा भाग म्हणजे 'अमिग्डाला', जो एखादा धोका ओळखून ताल्काळ आक्रमक किंवा बचावात्मक प्रतिक्रिया देतो.

आज सोशल मीडिया आणि बातम्यांमधील सततच्या नकारात्मकतेमुळे आपल्या मेंदूला प्रत्येक क्षणी



असुरक्षिततेचा संदेश मिळतो. परिणामी, आपला तार्किक भाग मागे पडतो आणि अमिग्डाला सदैव सक्रिय राहतो. याच कारणामुळे आज कोणी थोडी जरी टीका केली, तरी व्यक्ती स्वतःची चूक सुधारण्याऐवजी लगेच दहापट अधिक कडू शब्दांत 'रिएक्ट' करू लागते.

३. विचार, भावना आणि पेशीय आरोग्य

आपले मन हे आपल्या शरीररूपी वाहनाचा चालक आहे. जर चालकच अस्वस्थ, क्रोधित किंवा थकलेला असेल, तर गाडी कितीही महागडी असली तरी अपघात निश्चित आहे. वैज्ञानिक संशोधन हे स्पष्ट करते की आपली जीवशास्त्र प्रणाली आणि पेशी आपण जे काही पाहतो, ऐकतो किंवा बोलतो, ते सर्व ग्रहण करत असतात.

जेव्हा आपण सतत तणावाखाली किंवा भीतीच्या छायेत असतो, तेव्हा शरीरात 'कॉर्टिसोल' संप्रेरक वाढते, ज्यामुळे पचनक्रिया मंदावते आणि रक्तातील राखीव ग्लुकोज वेगाने बाहेर सोडले जाते. यामुळेच तणावग्रस्त तरुणांना रात्री दोन वाजता जंक फूड किंवा गोड खाण्याची तीव्र इच्छा होते, जी पुढे जाऊन लठ्ठपणा, मधुमेह आणि हृदयविकाराचे कारण ठरते. याशिवाय, छोट्या-छोट्या कामांसाठी, जसे की रस्ता लक्षात ठेवण्यापासून ते आपल्या जवळच्या व्यक्तीला संदेश लिहिण्यापर्यंत, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि यंत्रांवर वाढणारे अवलंबित्व आपली नैसर्गिक सर्जनशीलता आणि आत्मविश्वास कमकुवत करत आहे.

४. मुलांचे संगोपन आणि मेंदूचा विकास

अनेक पालक तक्रार करतात की मुले ऐकत नाहीत किंवा चिडचिडी झाली आहेत. तंत्रिका विज्ञानानुसार, भावनांशी संबंधित मेंदूचा भाग (अमिग्डाला) लहानपणीच पूर्ण विकसित होतो, तर तर्क आणि समजूतदारपणाशी संबंधित 'प्रीफ्रंटल कॉर्टेक्स' वयाच्या २४ ते २५ व्या वर्षी पूर्णपणे परिपक्व होतो. त्यामुळे किशोरवयीन मुलांना रागावण्यापेक्षा किंवा ओरडण्यापेक्षा त्यांची बचावात्मक यंत्रणा अधिक आक्रमक होते; त्यांना प्रेम, सुसंवाद आणि मैदानी खेळांच्या माध्यमातूनच योग्य दिशा देता येते.

मानसिक शांतता आणि ऊर्जा पुन्हा मिळवण्यासाठी व्यावहारिक सूत्रे:

'एका वेळी एकच काम' करण्याचा सरावः रील्सचा अंतहीन भटकाव थांबवा. एका वेळी केवळ एकच कार्य करण्याची सवय लावा; यामुळे मन भूतकाळातील पश्चात्ताप आणि भविष्यातील काल्पनिक चिंतांमधून मुक्त होऊन वर्तमान क्षणात स्थिर होते.

निसर्ग आणि मैदानाशी नाते : ज्याप्रमाणे एक ग्लास खारे पाणी अथांग समुद्रात मिसळल्यास त्याचा खारटपणा विरघळून जातो, त्याचप्रमाणे जेव्हा आपण बंद खोल्यांमधून बाहेर पडून मोकळे मैदान, हिरवळ, माती आणि जलस्रोतांच्या सान्निध्यात येतो, तेव्हा आपला ताण आपोआप शांत होऊ लागतो.

सकारात्मक संवाद आणि सद्भावनाः कटू शब्द आणि नकारात्मक चर्चांपासून दूर राहा. जेव्हा आपण मनापासून सर्वांच्या कल्याणाची इच्छा करतो, तेव्हा मेंदूमध्ये 'डोपामिन', 'सेरोटोनिन' आणि 'एंडोर्फिन' यांसारख्या आनंददायी रसायनांचा स्राव होतो, जे शरीरासाठी नैसर्गिक वेदनाशामक आणि रोगप्रतिकारक औषधाचे कार्य करतात. तंत्रज्ञान हे आपल्या सोयीचे साधन आहे, त्याला आपल्या मेंदूचा मालक बनू देऊ नका. डिजिटल शिस्त, नियमित शारीरिक व्यायाम आणि निसर्गप्रेमी आत्मीयता जोपासून आपण एक शांत, एकाग्र आणि ऊर्जावान जीवन जगू शकतो.

- (आरोग्य व फिटनेस तज्ज्ञ, शारीरिक शिक्षण विभाग, सेठ केसरीमल पोरवाल कॉलेज, कामठी, नागपूर)

एक ओंकार -प्रेम, करुणा आणि विश्वबंधुत्वाचा महामंत्र : गुरु नानक देव

मनिषा कांबळे
यवतमाळ

माणसाच्या श्रेष्ठत्वाची ओळख त्याच्या जन्माने, धर्माने, जातीने किंवा संपत्तीने होत नसून त्याच्या विचारांनी, कृतीने आणि दुसऱ्याविषयी असलेल्या संवेदनशीलतेने होते. इतिहासात अनेक महान व्यक्तींनी समाजाला विवेक, समता आणि मानवतेची दिशा दिली. गुरु नानक देव हे अशाच महान विचारवंतांपैकी एक आहेत, ज्यांनी आध्यात्मिकतेला केवळ उपासनेपुरते मर्यादित न ठेवता मानवी जीवनाच्या नैतिकतेशी, सामाजिक न्यायाशी आणि परस्पर सन्मानाशी जोडले. त्यांच्या विचारांचा गाभा माणसाला माणसाशी जोडणारा होता. आजही त्यांच्या शिकवणीचा विचार केला, तर तो आपल्या सामाजिक आणि वैयक्तिक जीवनाला अधिक अर्थपूर्ण बनविण्याची प्रेरणा देतो.

गुरु नानक देव हे मानवतेचा, समतेचा आणि बंधुभावाचा संदेश देणारे महान आध्यात्मिक विचारवंत होते. त्यांच्या बालपणापासूनच त्यांच्यात चिंतनशील वृत्ती, प्रश्न विचारण्याची प्रवृत्ती आणि मानवी जीवनाविषयी खोल जिज्ञासा होती. समाजात प्रचलित असलेल्या कर्मकांडांपेक्षा माणसाच्या आचरणाला, सद्विचारांना आणि अंतःकरणातील प्रामाणिकपणाला अधिक महत्त्व देण्याची त्यांची भूमिका होती. त्यांनी धर्माच्या नावाखाली निर्माण झालेल्या भेदभावाला प्रश्न विचारले आणि माणसाला विवेकाने जगण्याची प्रेरणा दिली.

गुरु नानक यांचे तत्त्वज्ञान एका विशिष्ट समूहापुरते मर्यादित नव्हते. त्यांच्या विचारांमध्ये संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाची भावना होती. 'एक ओंकार' ही संकल्पना त्यांच्या विचारविश्वाचा केंद्रबिंदू आहे. विश्वात मूलभूत एकत्व आहे, सर्व मानव एकाच अस्तित्वाच्या निर्मितीचा भाग आहेत, त्यामुळे कोणालाही कमी लेखण्याचा अधिकार दुसऱ्याला नाही, असा व्यापक आशय या विचारातून व्यक्त होतो. धर्म वेगळे असू शकतात, उपासनेच्या पद्धती वेगळ्या असू शकतात, परंतु माणसाच्या सन्मानाचा अधिकार सर्वांसाठी समान आहे, ही जाणीव त्यांच्या शिकवणीतून स्पष्ट होते.

समतेची शिकवण आणि भेदभावाला विरोध

गुरु नानक देव यांनी समाजातील जातिभेद, उच्च-नीचतेची भावना आणि सामाजिक विषमता यांना विरोध केला. माणसाची किंमत त्याच्या जातीवरून किंवा सामाजिक स्थानावरून ठरवणे चुकीचे आहे, हा विचार त्यांनी आपल्या आचरणातूनही स्पष्ट केला. तत्कालीन समाजात अनेक प्रकारचे भेदभाव अस्तित्वात होते. अशा परिस्थितीत त्यांनी समानतेचा विचार मांडणे हे केवळ धार्मिक नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाचे कार्य होते. त्यांच्या मते, माणसाने स्वतःच्या अहंकारातून बाहेर पडून इतरांशी समानतेने वागणे आवश्यक आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीला सन्मान मिळावा, तिच्या श्रमांची कदर व्हावी आणि तिच्या अस्तित्वाला महत्त्व दिले जावे, हा त्यांच्या विचारांचा मूलभूत आशय होता.

श्रमांचा सन्मान आणि प्रामाणिक जीवन

गुरु नानक यांनी प्रामाणिक श्रमांना जीवनातील महत्त्वाचे मूल्य मानले. त्यांच्या शिकवणीतील 'किरत करो' म्हणजे प्रामाणिकपणे काम करून जीवन जगणे. श्रम हे कोणत्याही व्यक्तीच्या प्रतिष्ठेला कमी करणारे नसून आत्मसन्मान वाढवणारे असतात, अशी त्यांची जीवनदृष्टी होती. दुसऱ्याच्या हक्कावर जगण्याऐवजी स्वतःच्या मेहनतीने जीवन घडवावे, अन्यायकारक मार्गांचा अवलंब करू नये आणि श्रमातून मिळालेल्या उत्पन्नाला नैतिकतेची जोड द्यावी, असे त्यांच्या विचारांतून शिकायला मिळते. आजच्या काळातही हा विचार अत्यंत महत्त्वाचा आहे. समाजात अनेकदा पद, पैसा आणि प्रतिष्ठा यांना अधिक महत्त्व दिले जाते. परंतु प्रामाणिक श्रम, नैतिकता आणि जबाबदारी या मूल्यांकडे दुर्लक्ष झाले, तर सामाजिक विश्वास कमकुवत होतो. गुरु नानक यांची शिकवण आपल्याला श्रमांचा सन्मान करण्याची आणि प्रामाणिकपणाला जीवनाचा आधार बनवण्याची प्रेरणा देते.

वादून घेण्याची संस्कृती

'वंड छको' हा गुरु नानक यांच्या शिकवणीतील आणखी एक महत्त्वपूर्ण विचार आहे. मिळवलेल्या संपत्तीचा, अन्नाचा आणि साधनांचा वाटा गरजू व्यक्तींसोबत वाटून घेणे, हा त्यामागचा व्यापक अर्थ आहे. समाजात केवळ स्वतःच्या सुखाचा विचार न करता इतरांच्या गरजांकडेही लक्ष देणे आवश्यक आहे. माणसाच्या जीवनातील खरी समृद्धी केवळ संपत्तीमध्ये नसून त्याच्या उदार वृत्तीमध्ये आणि सामाजिक सहभागामध्ये असते.

गुरु नानक यांच्या विचारांमधून विकसित झालेली लंगरची परंपरा ही या मूल्यांचे प्रभावी प्रतीक आहे. लंगरमध्ये सर्व व्यक्तींना एकत्र बसून भोजन करण्याची संधी मिळते. या परंपरेत जात, धर्म, सामाजिक स्थान किंवा आर्थिक परिस्थिती यांना भेदाचे कारण मानले जात नाही. एकत्र भोजन करणे ही साधी कृती वाटू शकते; परंतु तिच्यामागे समानता, सहजीवन आणि सामाजिक सलोख्याचा मोठा संदेश आहे. समाजातील भिंती तोडण्यासाठी विचारांबरोबरच व्यवहारातील कृतीही महत्त्वाची असते, याची जाणीव या परंपरेतून होते.

स्त्री सन्मान आणि मानवी प्रतिष्ठा

गुरु नानक देव यांनी स्त्रीविषयी आदराची भूमिका मांडली. स्त्रीला कमी लेखणाऱ्या सामाजिक मानसिकतेवर त्यांनी प्रश्न उपस्थित केले. स्त्रीच्या अस्तित्वाला, योगदानाला आणि प्रतिष्ठेला महत्त्व देणारा त्यांचा विचार त्या काळातील सामाजिक परिस्थितीच्या संदर्भात विशेष महत्त्वाचा ठरतो. स्त्री ही समाजाच्या निर्मितीमध्ये, कुटुंबाच्या उभारणीत आणि जीवनाच्या सातत्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते, याची जाणीव त्यांच्या विचारांतून दिसते.

आजही स्त्री-पुरुष समानतेचा प्रश्न विविध स्वरूपांत समाजासमोर आहे. शिक्षण, रोजगार, निर्णयक्षमता, सुरक्षितता आणि सामाजिक सन्मान या क्षेत्रांमध्ये समान संधी निर्माण करणे आवश्यक आहे. गुरु नानक यांच्या विचारांचा अर्थ केवळ स्त्रीचा गौरव करणे नसून तिच्या अधिकारांचा, स्वातंत्र्याचा आणि व्यक्तिमत्त्वाचा आदर करणे असा व्यापक घेतला पाहिजे.

आध्यात्मिकता म्हणजे विवेकपूर्ण जीवन

गुरु नानक यांनी अध्यात्माला माणसाच्या आचरणाशी जोडले. केवळ धार्मिक विधी करणे, बाह्य स्वरूप बदलणे किंवा धार्मिक ओळख प्रदर्शित करणे म्हणजे आध्यात्मिकता नव्हे. सत्य, प्रामाणिकपणा, करुणा, संयम आणि नैतिकता यांचा आपल्या जीवनात स्वीकार करणे ही अधिक महत्त्वाची बाब आहे. माणसाने आपल्या वर्तनातून इतरांना त्रास देऊ नये, अहंकाराला महत्त्व देऊ नये आणि स्वतःच्या कृतींचे आत्मपरीक्षण करावे, अशी शिकवण त्यांच्या विचारांमधून मिळते. त्यांनी आपल्या प्रवासातून आणि संवादातून विविध



प्रदेशांतील लोकांपर्यंत विचार पोहोचवले. विविध धर्म, परंपरा आणि विचारधारांतील लोकांशी संवाद साधण्याची त्यांची भूमिका ही समाजातील परस्पर समज वाढवणारी होती. मतभिन्नता असली तरी संवादाची दारे बंद करू नयेत, हा त्यांच्या विचारांचा आजच्या काळातील महत्त्वाचा संदर्भ आहे.

आजच्या समाजासाठी गुरु नानकांचे विचार

आज विज्ञान, तंत्रज्ञान आणि शिक्षणाच्या क्षेत्रात मोठी प्रगती झाली आहे. तरीही सामाजिक द्वेष, धार्मिक असहिष्णुता, आर्थिक विषमता, भेदभाव आणि स्वार्थी प्रवृत्ती यांसारख्या समस्या पूर्णपणे संपलेल्या नाहीत. अशा परिस्थितीत गुरु नानक देव यांचे विचार केवळ इतिहासातील शिकवण म्हणून वाचण्याऐवजी वर्तमान जीवनाशी जोडणे आवश्यक आहे.

त्यांच्या विचारांचा स्वीकार म्हणजे दुसऱ्याच्या धर्माचा आदर करणे, दुर्बल व्यक्तीला मदतीचा हात देणे, श्रम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला सन्मान देणे, अन्यायाविरुद्ध विवेकाने उभे राहणे आणि समाजात बंधुभाव वाढवणे. ही मूल्ये केवळ एखाद्या धर्माची नसून मानवी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक आहेत. गुरु नानक देव यांचे जीवन आणि विचार आपल्याला एक महत्त्वाचा प्रश्न विचारतात, आपण धर्माच्या नावाने माणसांमध्ये अंतर निर्माण करतो आहोत की मानवतेच्या माध्यमातून माणसांना जोडतो आहोत? या प्रश्नाचे उत्तर आपल्या कृतीतून दिले पाहिजे. त्यांच्या शिकवणीची खरी ताकद ही केवळ स्मरणात नसून आचरणात आहे. प्रेम, करुणा, समता, प्रामाणिक श्रम आणि बंधुत्व ही मूल्ये समाजात रुजली. साहित्यसंपदा आठव्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून राज्यस्तरीय साहित्य संमेलनाचे आयोजन साहित्यसंपदा संस्थापक वैभव धनावडे यांच्या संकल्पनेतून चिंचवड पुणे येथे करण्यात आले होते.सदर संमेलनास अध्यक्ष म्हणून राजन लाखे अध्यक्ष -महाराष्ट्र साहित्य परिषद,चिंचवड शाखा तर संमेलन उदघाटक म्हणून जेष्ठ साहित्यिक प्रतिभा सराफ यांनी मुख्य उपस्थिती दर्शवली. निमंत्रित म्हणून रायगड भूषण, कवी लेखक रमेश धनावडे, भाषा तज्ज्ञ महेश कवळे,कवी श्रीकांत पेटकर (कौशल), यांनी साहित्यसंपदास पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. स्वागताध्यक्षा म्हणून अर्चना गोरे यांनी काम पाहिले, कार्यवाहक प्रांजली मोहिते यांच्या विशेष मेहनतीतून चित्र आणि हस्तवस्तू कला प्रदर्शन पार पडले.

संमेलनाच्या सुरवातीला ग्रंथ दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.ग्रंथ दिंडीचे विशेष म्हणजे शिक्षकरत्न हनुमंत देशमुख यांच्या संकल्पनेतून शाश्वत विकासाची ध्येये अनुसरून, वापरलेल्या वस्तूंपासून (टाकाऊ पासून टिकाऊ) दिंडी बनवली होती. कवी दिलीप मोकल यांची पुस्तकावरील गाणी दिंडीमध्ये विशेष आकर्षण ठरली. ग्रंथ दिंडीची अभिनव संकल्पना सत्यात उतरवण्यासाठी प्रतिमा देशमुख यांचा मोठा हातभार लाभला. वाचन चळवळीप्रती साहित्यसंपदाची असणारी निरंतर बांधिलकी ग्रंथदिंडीमधल्या वाचन विचार, वाचन गीते व वाचन कृती कार्यक्रमातून दिसून येत होती.

कार्यक्रमाचे उदघाटन सरस्वती वंदनेने झाले, अर्चना भांडारकर यांनी आपल्या उत्तम निवेदनातून कार्यक्रमाची रंगत वाढवली. सदर प्रसंगी दीपा लागवणकर यांनी आपल्या सुमधुर आवाजातून गणेश वंदना सुद्धा सादर केली. दीप प्रज्वाला नंतर साहित्यसंपदाच्या वार्षिक अहवालाचे वाचन कारगिल युद्धातील निवृत्त सैनिक कवी संजय पाटील यांनी केले. सदर प्रसंगी सलग तीन दिवस अखंड कथमहोत्सव वाचन सोहळा यशवीरित्या पार पाडल्या बद्दल साहित्यपंपदास डायमंड बुक ऑफ रेवोकॉर्ड्सतर्फे नॅशनल रेकॉर्डसचे सन्मानपत्र देऊन गौवरविण्यात आले. सदर रेकॉर्डचे सन्मानपत्र संस्थापक वैभव धनावडे आणि साहित्यसंपदा कार्यकारणीस बहाल करण्यात आले.

प्रथम सत्रात वैभव धनावडे लिखित 'आशादीप' लेख संग्रहाचे उदघाटन डॉ.प्राची आंबोलकर, डॉ.सुवंणा पाटील या व इतर मान्यवरांच्या उपस्थित पार पडले. अश्विनी बोलके यांची प्रस्तावना सदर पुस्तकास लाभली आहे. मानसी नेवगी यांनी निवेदनाची बाजू सांभाळली. तसेच कवी सचिन सवाई यांच्या 'पटलं तर घ्या' आणि 'माझी गीता ..माज्या कविता' दोन काव्यसंग्रहाचे उदघाटन नगरसेवक अनंत कोऱ्हाळे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत झाले. प्रा.भरत खैरकर यांनी कवी सवाई याना शुभेच्छा देताना त्यांच्या लेखन शैलीचे कौतुक केले.

द्वितीय सत्रात काव्यवाचन पडले. महाराष्ट्रातील विविध भागातील कवी कवयित्रींनी यात सहभाग नोंदविला. वैशाली कदम यांनी आपल्या खुमासदार निवेदनाने श्रोत्यांना खिळवून ठेवले. मंजुळ चौधरी यांनी गझलसत्रात कार्यवाहकाची भूमिका तर शंतनू पुराणिक यांनी गझल सत्राचे अध्यक्ष म्हणून मार्गदर्शन केले. कुंदा झोपे यांनी उपस्थित लहान मुलांना प्रोत्साहन देत त्यांच्याकडून बालकविता सादर करून घेतल्या.

'कथांचे भविष्य' या परिसंवादाच्या माध्यमातून कथांच्या भविष्यावर चर्चा झाली. लालसिंग वैराट यांनी सूत्रधाराच्या भूमिका बजावली, बोली भाषा अभ्यासक प्रा.संध्या महाजन यांचीही उपस्थिती लाभली. संमेलनाची सांगता आदर्श शिक्षकांना शिक्षकरत्न, समाजात आशावाद पसरविणाऱ्या पुस्तकांना पुस्तकरत्न, समाजात आपल्या कायार्तून बहुमूल्य मार्गदर्शन करणाऱ्या व्यक्तींना दीपस्तंभ, युवा प्रेरणा, आधारवड असे पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

बाहेर प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यवाहक म्हणून किसन पेडणेकर यांनी जबाबदारी पार पाडली. डिजिटल पार्टनर म्हणून मनोमय मीडिया यांनी काम पहिले.

साहित्यसंपदा आठवा वर्धापनदिन संपन्न



दै. सिंहवाणी वृत्त, पुणे

थोडक्यात

आजनीत संविधानाचा जागर





दै. सिंहवाणी वृत्त, कामठी

कामठी तालुक्यातील आजनी येथे भारतीय संविधान दिनानिमित्त विविध ठिकाणी विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना वंदन करून संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. सकाळी ग्राम पंचायत कार्यालयात सरपंच हेमराज दवंडे, सदस्य गणपत झलके, हेमलता उकेबोंद्रे, गायत्री हरणे, कर्मचारी राजू लायबर, बिंदू गणवीर, प्रिया चिपडे, भीमराव नागेसे, हर्षा हेटे, वत्सला इरपाते, नामदेव हेटे, चैतराम हेमणे, वसंता भोयर आदींनी डॉ बाबासाहेबांच्या प्रतिमेला वंदन करून उद्देशिकेचे वाचन केले.

तर, सायंकाळी सावित्रीबाई ज्योतीराव फुले निःशुल्क अभ्यासिका आणि वाचनालयात संचालक लीलाधर दवंडे यांनी विद्यार्थ्यांना संविधानाचे महत्त्व समजावून सांगितले. यावेळी राजकुमार दवंडे, तनुश्री शेंडे, तन्मय वाणी, रोहित सिरसाम, प्रियंका घोडे, तृप्ती भोयर, लीना वाणी, सृष्टी दवंडे, अंकित जेवडे, खुशबू फुकट, संस्कृती फुकट, कार्तिक दवंडे, तनुश्री हिवरकर, हिना वाणी, देवांश खेवले आदी विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. आजनी येथील बौद्ध विहारात संविधान दिन साजरा करतांना ग्राम पंचायत सदस्यांसह अनेक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

चाचेरच्या पीएमश्री शाळेत संविधान दिन

संविधानाच्या मूल्यांची विद्यार्थ्यांना दिली जाणीव; मान्यवरांची प्रमुख उपस्थिती



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

चाचेर येथील पीएमश्री उच्च प्राथमिक जि.प शाळेत संविधान दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाचे महत्त्व, लोकशाही मूल्ये तसेच नागरिकांचे हक्क व कर्तव्ये याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जीवन सहारे, उपाध्यक्ष शुभांगी आंबीलदुके, किरण बरबटे, रामकृष्ण आंबीलदुके, योगेश निनावे, ठोसेरताई व चौरेताई यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मुख्याध्यापक अनिल गडपायले यांच्यासह शिक्षकवृंद रविंद्र घुगे, भारती साखरकर, कु. परवीन शेख, प्रीती खंगार, शिल्पा उकुड्रे,नेहा निमजे, रुचिला खंडाईत व संगीता बालकोटे तसेच इतरही शिक्षकवृंद, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संविधान दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये संविधानाबद्दल आदर, लोकशाहीची जाणीव आणि जबाबदार नागरिकत्वाची भावना रुजविण्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रम उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात पार पडला.

मांगली (चांदे) येथील सारीपुत्त बुद्ध विहारात संविधान दिन साजरा



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

गट ग्रा.पं बाबदेव अंतर्गत येत असलेल्या मांगली (चांदे) येथील सारिपुत्त बुद्ध विहारात तथागत भगवान गौतम बुद्ध, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोला माल्यार्पण, पूजा अर्चना व मान्यवरांनी संविधान पुस्तकीचे महत्व विशद करून संविधान दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी पंचकमिटी अध्यक्ष भीमसेन तांबे, मिलिन्द सोनटक्के, मुरलीधर सवायतुल, प्रकाश बावनगड़े, पोलीस पाटील सतीश मेश्राम, रमेश नागपुरे, विजय तांबे, वैभव तांबे, शंकुतला मेश्राम, मंदा शंभरकर, सपना शंभरकर, स्वाती तांबे, मीनाक्षी तांबे, शिल्पा मेश्राम उपस्थित होते.

शोभा अंधारे यांचे निधन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

शोभा माणिकराव अंधारे यांचे त्रिमूर्ती नगर येथील राहत्या घरी दीर्घ आजाराने गुरूवारी दुपारी १ वाजता दुःखद निधन झाले. त्यांची अंत्यविधी शुक्रवारी सकाळी ११.३० वाजता सहकार नगर घाट येथे नागपुर करण्यात येईल. त्यांच्या पश्चात पती प्रा. माणिकराव अंधारे तसेच मुले डॉ. अमोल अंधारे, अजित अंधारे व मुलगी स्नेहल अंधारे आणि आप्तपरिवार आहे.



एमएसआयडीसीद्वारे नागपुरात पहिल्या 'पायाभूत सुविधा गुंतवणूक परिषदे'चे आयोजन

नागपूरला भारताच्या विकासगाथेतील एक महत्त्वाचे केंद्र म्हणून प्रस्थापित करण्याचा प्रयत्न



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, नागपूर महानगरपालिका आणि नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने, सोमवार, ३० नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजल्यापासून हॉटेल रॅडिसन ब्लू, नागपूर येथे 'रायझिंग नागपूर पायाभूत सुविधा गुंतवणूक परिषद २०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. नागपूर महानगरपालिका, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ आणि नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार ३० नोव्हेंबर २०२६ रोजी आयोजित रायझिंग नागपूर पायाभूत सुविधा गुंतवणूक परिषद २०२६ च्या निमंत्रण पत्रिकेचे अनावरण महापौर निता ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी आमदार संजय भेंडे, उपमहापौर लिला हाथीबेड, सत्तापक्ष नेते नरेंद्र(बाल्या) बोरकर, मनपा आयुक्त डॉ. विपीन, एमएसआयडीसीचे सीएमडी डॉ. ब्रिजेश दीक्षित, माजी आमदार अशोक मानकर, नगरसेवक सुधीर (बंडू) राऊत, नगरसेवक सचिन नाईक, ओएसडी सुधीर देऊळगावकर, अतिरिक्त आयुक्त अंकित, मुरुगानंथम एम., मिलिंद मेश्राम, यांच्यासह इतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

'नागपूरच्या विकासाला चालनाः पीपीपी, बीओटी आणि डीबीएफओटी मॉडेलद्वारे पायाभूत सुविधांच्या संधी' या संकल्पनेवर आधारित या परिषदेत धोरणकर्ते, संस्थात्मक गुंतवणूकदार, पायाभूत सुविधा निधी, विकासक, ईपीसी कंपन्या आणि वित्तीय संस्था एकत्र येणार आहेत. याद्वारे नागपूर आणि विदर्भातील विविध गुंतवणूक संधींचा शोध घेतला जाईल.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य आणि नितीन गडकरी, रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री, भारत सरकार हे उपस्थित राहणार आहेत. तसेच, चंद्रशेखर बावनकुळे, महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य; शिवेंद्रसिंहराजे भोसले, सार्वजनिक बांधकाम मंत्री, अॅड. आशिष जयस्वाल, महापौर नीता ठाकरे, महापौर, नागपूर शहर हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहतील.

आज वनामती येथे विशेष युवा संगीत सभेचे आयोजन

शास्त्रीय संगीतापासून फ्युजनपर्यंत युवा प्रतिभेचा सुरेल आविष्कार, युवा कलागुणांना मिळणार आकाशवाणीचे भव्य व्यासपीठ!

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नवोदित आणि युवा कलाकारांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच त्यांना आपली कला सादर करण्याची हक्काची संधी उपलब्ध करून देण्यासाठी आकाशवाणी नागपूर केंद्राच्या वतीने 'एअर रॉयझिंग स्टॉर्स- सेशन १ (२०२६)' या विशेष उपक्रमांतर्गत भव्य युवा संगीत सभेचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, दिनांक २७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता धरमपेठ, नागपूर येथील वनामती सभागृह येथे हा संगीत सोहळा रंगणार आहे.

युवा पिढीतील सुप्त कलागुणांना वाव मिळावा, नव्या कलाकारांना रसिकांसमोर आपली कला सादर करण्याची संधी मिळावी आणि भारतीय संगीताच्या समृद्ध परंपरेचा परिचय नव्या पिढीला व्हावा, या उद्देशाने आकाशवाणी नागपूरने हा अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. या संगीत सभेच्या माध्यमातून शास्त्रीय संगीत, वाद्यसंगीत, मराठी भावगीत आणि आधुनिक संगीताचा सुरेल संगम रसिकांना अनुभवता येणार आहे.

या कार्यक्रमात नवोदित युवा गायक आनंद चिमोटे हे शास्त्रीय गायन सादर करणार आहेत. तर ऋषिकेश करमरकर यांच्या दिलरुबा वादनातून भारतीय अभिजात वाद्यसंगीताची मधुर अनुभूती रसिकांना मिळणार आहे. सुगम संगीताच्या क्षेत्रातील तेजस्विनी खोडतकर या आपल्या सुरेल आवाजात मराठी भावगीतांची मेजवानी सादर करणार आहेत. कार्यक्रमाचे आणखी एक प्रमुख आकर्षण युवा कलाकार शुभम चोपकर आणि संकेत माकोडे तसेच वाद्यवृंद यांच्या 'बांसुरीवाला कलेक्टिव्ह म्युझिकल बँड ' च्या माध्यमातून फ्युजन संगीताचा अनोखा आविष्कार असणार आहे.

संविधानाचा खरा सन्मान कृतीतूनच : अभिजीत दीपके

संविधान चौकात रक्तदान शिबिरात रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेले भारतीय संविधान हे समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यांचा आधारस्तंभ आहे. संविधानाने दिलेली ही मूल्ये केवळ उत्सव किंवा औपचारिक अभिवादनापुरती मर्यादित न ठेवता दैनंदिन आचरणात उतरवली पाहिजेत. रक्तदानासारख्या उपक्रमातून माणुसकीची भावना अधिक दृढ होते. रक्ताला कोणतीही जात, धर्म किंवा भेदभाव नसतो. त्यामुळे रक्तदान हे सामाजिक एकतेचे आणि मानवतेचे प्रभावी प्रतीक आहे, असे प्रतिपादन काँकरोच जनता पाटीर्चे (सीजेपी) संस्थापक अभिजीत दीपके यांनी केले.

भारतीय संविधान दिनानिमित्त गुरुवारी (२६ नोव्हेंबर) संविधान चौक येथे आयोजित रक्तदान शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. समता सैनिक दल, प्रेरणादीप बहुउद्देशीय संस्था आणि टीम धम्मा फेस्टिव्हल यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. या शिबिरात ५० रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत रक्तदान केले. कार्यक्रमाला काँकरोच जनता पाटीर्चे सह-संयोजक आशुतोष रांका प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

तसेच समता सैनिक दलाचे निलेश बागडे, रमेश नागदवणे, सौरभ मेश्राम, सिद्धार्थ नंदीश्वर, विद्यानंद रंगारी, क्षितिज रामटेके, प्रदीप गणवीर, धम्मरक्षित वाघदे, राजेश धमगाये, संजय मेश्राम, राजकुमार मेश्राम, रोहन वासनिक, निखिल ताकसांडे आणि योगेश सुखदेवे यांच्यासह प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी अभिजीत दीपके पुढे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकाला समानतेचा अधिकार आणि सन्मानाने जगण्याचा मार्ग दिला. मात्र, संविधानातील मूल्ये केवळ पुस्तकात किंवा भाषणात राहून चालणार नाहीत, तर ती आपल्या दैनंदिन आचरणात उतरली पाहिजेत. समाजातील गरजू व्यक्तीच्या मदतीला धावून जाणे, संकटात असलेल्या रुग्णाला रक्त उपलब्ध करून देणे आणि सामाजिक जबाबदारी स्वीकारणे, हीच संविधानाच्या मानवतावादी विचारांची खरी अंमलबजावणी आहे. रक्तदानातून एखाद्याचा जीव वाचविण्याचे समाधान मिळते. त्यामुळे तरुणांनी अशा सामाजिक उपक्रमांमध्ये पुढाकार घ्यावा, असे आवाहनही अभिजीत दीपके यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी समता सैनिक दल, प्रेरणादीप बहुउद्देशीय संस्था आणि टीम धम्मा फेस्टिव्हलच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

'अॅग्रोव्हिजन २०२६' व जलपरिषदेचे आज उद्घाटन

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, जलसंवर्धन मंत्री संजय राठोड, राज्यमंत्री पंकज भोयर व आशिष जयस्वाल यांची प्रमुख उपस्थिती, 'दुष्काळाचा सामना : पाणी व्यवस्थापन आणि पीक नियोजन' मध्यवर्ती संकल्पना



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञान, संशोधन आणि शेतीतील नव्या संधींची माहिती मिळावी, तसेच बदलत्या हवामानाच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सक्षम बनविण्याच्या उद्देशाने आयोजित मध्य भारतातील सर्वात मोठे कृषी प्रदर्शन 'अॅग्रोव्हिजन २०२६' आणि जलपरिषदेचा भव्य उद्घाटन सोहळा शुक्रवार, २७ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आला आहे. अमरावती रोडवरील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मैदानावर सकाळी १०.३० वाजता होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय मंत्री व अॅग्रोव्हिजनचे मुख्य प्रवर्तक नितीन गडकरी राहणार आहेत. जलपरिषदेचे उद्घाटन मृदा व जलसंवर्धन मंत्री संजय राठोड यांच्या हस्ते होणार आहे. राज्यमंत्री पंकज भोयर व आशिष जयस्वाल यांच्या सह आयसीआरआयएसएटी, हैदराबादचे महासंचालक डॉ. हिमांशु पाठक, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या व माफसू नागपूरच्या कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांची उपस्थिती राहणार आहे.

'दुष्काळाचा सामना : पाणी व्यवस्थापन आणि पीक नियोजन' ही यंदाच्या अॅग्रोव्हिजनची मध्यवर्ती संकल्पना आहे. या चार दिवसीय कृषी महोत्सवात अकआणि स्मार्ट तंत्रज्ञानाच्या माध्यमातून एकात्मिक कृषी नियोजनावर विशेष भर देण्यात येणार आहे. शिक्षण, प्रशिक्षण आणि सक्षमीकरण या त्रिसूत्रीवर गेली १६ वर्षे वाटचाल करणाऱ्या अॅग्रोव्हिजनने शेतकरी, कृषी तज्ज्ञ, संशोधक, उद्योजक, तंत्रज्ञान क्षेत्र आणि शासन यांच्यात ज्ञानाची देवाणघेवाण घडवून आणली आहे. कार्यशाळा, कृषी प्रदर्शन आणि परिसंवाद यांच्या माध्यमातून आधुनिक शेतीचे ज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचा या उपक्रमाचा प्रयत्न आहे. विदर्भातील शेतकऱ्यांसमोर असलेल्या दुष्काळाच्या आव्हानावर मात करण्यासाठी यंदाच्या अॅग्रोव्हिजनमध्ये पाणी व्यवस्थापन, जलसंधारण आणि पीक नियोजन या विषयांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. कमी पाण्यात अधिक उत्पादन घेणे, उपलब्ध जलस्रोत यांचा प्रभावी वापर, आधुनिक कृषी तंत्रज्ञान आणि शेतीतील नव्या प्रयोगांबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाणार आहे. विविध विषयांवर विशेष कार्यशाळा आयोजित केल्या आहेत, ज्या मध्ये २७ नोव्हेंबर रोजी दुपारी ३.३० वाजता 'कृषी क्षेत्रातील स्टार्टअप्स आणि माहिती तंत्रज्ञान' या विषयावर विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

अवकाळी पावसामुळे धान उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणीत वाढ!

शेतात ठेवलेल्या धानाला फुटले अंकुर, शेतकऱ्यांवर दुहेरी संकट

सोनपुरी परिसरात पावसामुळे धानाची गुणवत्ता व उत्पादन प्रभावित; अंकुर आलेल्या धान पिकाचे तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना लवकरात लवकर आर्थिक मदत देण्याची गोंदिया जिल्हा किसान काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष जितेश राणे यांची शासनाकडे मागणी

दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा- राजु फुडे

गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा तालुक्यासह सोनपुरी परिसरात झालेल्या अवकाळी पावसाने धान उत्पादक शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. धान कापणी व मळणीच्या काळात झालेल्या पावसामुळे शेतात कापून ठेवलेले धान पीक भिजले. सततचा ओलावा आणि पावसामुळे आता शेतात ठेवलेल्या धानाला अंकुर फुटू लागले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे.

शेतकऱ्यांनी मोठ्या मेहनतीने आणि खर्च करून धानाचे पीक तयार केले होते. मात्र, कापणीच्या ऐन हंगामात निसर्गाने अचानक अवकृपा दाखविल्याने शेतकऱ्यांचा हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. पावसामुळे शेतात कापून ठेवलेले धान भिजल्याने त्याला अंकुर फुटण्यास सुरुवात झाली आहे. परिणामी धानाच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम झाला असून बाजारात योग्य भाव मिळण्याची शक्यताही कमी झाली आहे. आधीच विविध नैसर्गिक संकटे आणि वाढत्या शेती खर्चामुळे त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांसमोर आता आर्थिक संकट अधिक गडद झाले आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत गोंदिया जिल्हा किसान काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष जितेश राणे यांनी राज्य शासन आणि जिल्हा प्रशासनाकडे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने दिलासा देण्याची मागणी केली आहे.

पावसामुळे ज्या शेतकऱ्यांच्या धान पिकाला अंकुर फुटले आहेत, अशा शेतांची महसूल व कृषी विभागाच्या संयुक्त पथकामार्फत तातडीने पाहणी व सर्वेक्षण करण्यात यावे. प्रत्यक्ष शेतात जाऊन नुकसानीची वस्तुस्थिती तपासावी आणि पारदर्शकपणे पंचनामे तयार करावेत, अशी मागणी त्यांनी केली आहे. तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना कोणताही विलंब न करता योग्य आर्थिक नुकसानभरपाई देण्यात यावी, जेणेकरून या नैसर्गिक आपत्तीमुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळू शकेल, अशी मागणी जितेश राणे यांनी शासनाकडे केली आहे.



ते म्हणाले की, शेतकऱ्यांच्या कष्टाची कमाई पावसामुळे मातीमोल होत आहे. अशा संकटाच्या काळात शासन आणि प्रशासनाने संवेदनशीलता दाखवून शेतकऱ्यांच्या हिताचा तातडीने निर्णय घेणे आवश्यक आहे. अंकुर फुटलेल्या धानामुळे नुकसान झालेल्या एकाही पात्र शेतकऱ्याला शासकीय मदतीपासून वंचित ठेवू नये.

आता नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे लक्ष शासन आणि जिल्हा प्रशासनाच्या भूमिकेकडे लागले आहे. नुकसानीचे सर्वेक्षण किती लवकर पूर्ण होते आणि शेतकऱ्यांना आर्थिक मदत कधी मिळते, याकडे संपूर्ण परिसरातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

थोडक्यात

संविधान के सम्मान में कामठी में पहली बार निकली 'वॉक फॉर संविधान' रैली

कॉकरोच जनता पार्टी के संस्थापक अध्यक्ष अभिजीत दीपके, सांसद श्यामकुमार बर्वे, तहसीलदार गणेश जगदाले सहित अनेक गणमान्य नागरिकों की रही उपस्थिति



दै. सिंहवाणी वृत्त, कामठी

भारतीय संविधान दिवस के अवसर पर हरदास फाउंडेशन के तत्वावधान में कामठी में पहली बार 'वॉक फॉर संविधान' रैली का आयोजन किया गया। भारतीय संविधान के प्रति जनजागृति निर्माण करने तथा नागरिकों को उनके संवैधानिक अधिकारों, कर्तव्यों और लोकतांत्रिक मूल्यों के प्रति जागरूक करने के उद्देश्य से इस पहल का आयोजन किया गया। कार्यक्रम का आयोजन हरदास फाउंडेशन के अध्यक्ष एवं कार्यक्रम के अध्यक्ष संघदीप बेलेकर के नेतृत्व में किया गया। उनके नेतृत्व में आयोजित इस पहल के माध्यम से संविधान के मूल्यों को जन-जन तक पहुंचाने तथा नागरिकों में संवैधानिक जागरूकता बढ़ाने का संदेश दिया गया।

कार्यक्रम में रामटेक लोकसभा क्षेत्र के सांसद मा. श्यामकुमार बर्वे, कामठी तहसील के तहसीलदार गणेश जगदाले, कॉकरोच जनता पार्टी के संस्थापक अध्यक्ष अभिजीत दीपके, आशुतोष रांका, अजिंक्य शिंदे, अतुल खोबरागड़े, नागदीपंकर भंते जी तथा कामठी नगर परिषद के समस्त नगरसेवक प्रमुख रूप से उपस्थित रहे। इस आयोजन के माध्यम से नागरिकों को भारतीय संविधान में निहित न्याय, स्वतंत्रता, समता और बंधुता के मूल्यों का महत्व समझाने का प्रयास किया गया। साथ ही संविधान द्वारा प्रत्येक नागरिक को दिए गए मौलिक अधिकारों एवं मौलिक कर्तव्यों के प्रति जागरूक रहने का संदेश दिया गया।

कार्यक्रम का सूत्र संचालन बबलू रामटेके ने किया। आयोजन को सफल बनाने में टीम के सदस्य आरजू कांबले, विदेश डोंगरे, विद्यानंद खोबरागड़े, राजन बागड़े, पंकज वानखेड़े, कुणाल मेश्राम, प्रशांत ऊके, नितिन डोनेकर, विनीत नागदेवे, सिद्धान्त बागड़े एवं समस्त टीम सदस्यों ने महत्वपूर्ण योगदान दिया। कामठी में पहली बार आयोजित इस पहल के माध्यम से हरदास फाउंडेशन ने संविधान के प्रति सम्मान, सामाजिक एकता और नागरिक जागरूकता का संदेश समाज तक पहुंचाने का प्रयास किया।

संविधान दिनानिमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

संविधान दिनाचे औचित्य साधून गुरुवार, दि. २६ नोव्हेंबर रोजी सक्करदरा, सेवासदन नगर, प्रभाग क्रमांक ३०, दक्षिण नागपूर येथे नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे आयोजन मधु श्यामजी थोरात (विशेष कार्यकारी अधिकारी) यांच्या पुढाकाराने करण्यात आले. श्रावण हॉस्पिटल आणि किडनी इन्स्टिट्यूटच्या चार तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने शिबिरात उपस्थित राहून नागरिकांना आरोग्य तपासणीची मोफत सेवा प्रदान केली. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून श्यामभाऊ थोरात (अध्यक्ष, नागपूर शहर विकास समिती), मा. अजय पाटील (सामाजिक कार्यकर्ते) आणि तारा मेश्राम (पत्रकार) यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

या आरोग्य तपासणी शिबिरामध्ये नागरिकांसाठी नेफ्रोलॉजी व युरोलॉजी, डायलेसिस, रेडिओलॉजी व पॅथॉलॉजी, गायनॅकॉलॉजी व ऑन्कोगायनॅकॉलॉजी तसेच ऑर्थोपेडिक अशा विविध वैद्यकीय विभागांशी संबंधित तपासण्या मोफत करण्यात आल्या.

नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

संविधान दिनानिमित्त आयोजित या उपक्रमाला परिसरातील अनेक नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोफत आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे आणि सर्वसामान्यांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता.

अग्रवाल विज्ञान महाविद्यालयात संविधान दिन

दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा: येथील स्थानिक शंकरलाल अग्रवाल विज्ञान महाविद्यालय येथे संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र शासन व समाज कल्याण गोंदिया यांच्या पत्रानुसार करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ एस नारायण मूर्ती तर प्रमुख अतिथीपदी ग्रंथपाल प्रा राहुल कवाडे प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ पुनम ठाकूर उपस्थित होते. आपल्या मनोगतामध्ये प्रा राहुल कवाडे आणि प्रा. विजया कवाडे यांनी संविधान या विषयावर सविस्तर आणि सखोल माहिती दिली त्यानंतर आपल्या मनोगतामध्ये डॉ ठाकूर यांनी संविधान कशाप्रकारे लिहिले गेले यावर विवेचन केले शेवटी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये डॉ मूर्ती यांनी एकूणच संविधानाचे प्रास्ताविक उद्देशिका याबद्दल सविस्तर माहिती देऊन विद्यार्थ्यांचे ज्ञान वृद्धिंगत केले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने संविधान प्रस्ताविकाचे वाचन घेऊन सर्वांकडून त्याचे पालन करण्याकरिता शपथ घेण्यात आली. या सर्व कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या समान संधी केंद्र व राष्ट्रीय सेवा योजना यांचे वतीने करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ प्रवीण पाटील यांनी केले याकरिता महाविद्यालयातील सर्व प्रवेशित विद्यार्थी प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



दीक्षाभूमीवर संविधान प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन

संविधान चौक, इंदोरा विहारात बाबासाहेबांना अभिवादन, विमानतळ परिसरातही महामानवाचा जयघोष



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

संविधानदिना निमित्त दीक्षाभूमीसह शहरातील विविध ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून संविधानाप्रती निष्ठा व्यक्त करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमी आणि अखिल भारतीय धम्मसेना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात दीक्षाभूमी येथील संविधान स्तंभाजवळ संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. स्मारक समितीचे अध्यक्ष तथा धम्मसेना नायक भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. यावेळी त्यांनी उपस्थितांना संविधानाचे पालन आणि संरक्षण करण्याची शपथ दिली.

दीक्षाभूमी येथे भदंत ससाई यांच्या उपस्थितीत बुद्धवंदना घेण्यात आली. तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच स्तूपाच्या आतील भागात बाबासाहेबांच्या अस्थि कलशाला वंदन करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना भदंत ससाई म्हणाले, संविधानाने देशातील प्रत्येक नागरिकाला स्वतंत्र भारतात समान अधिकार दिले आहेत. तरुण पिढीमध्ये संविधानाची मूल्ये रुजविणे हाच संविधानदिन साजरा करण्यामागील प्रमुख उद्देश आहे. संविधानाचे महत्त्व समजून घेण्यासोबतच त्याचे संरक्षण करण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाने पार पाडली पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले. तत्पूर्वी भदंत ससाई यांनी इंदोरा बुद्ध विहाराच्या प्रांगणातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर इंदोरा चौकातील पुतळ्यालाही अभिवादन करण्यात आले. संविधान चौक आणि विमानतळ परिसरातील बाबासाहेबांच्या पुतळ्यांना पुष्पमाला अर्पण करून मानवंदना देण्यात आली. यावेळी परिसरात बाबासाहेबांचा जयघोष करण्यात आला.

कार्यक्रमाला भंते नागसेन, भंते प्रज्ञाबोधी थेरो, भंते धम्मविजय, भंते धम्मपाल, भंते महानाग, भंते बुद्धदीप, भंते शांतीनाग, भंते नागवंश, भंते कश्यप, भंते धम्मप्रकाश, भंते कोदोसांग, भंते संघ, भंते धम्मशील, भंते धम्मदीप, भिक्षुणी संघप्रिया यांच्यासह धम्मसेनेचे शैलेश सवईथुल, धीरज बोरकर, नन्ना सवाईथुल, अमन मेश्राम, मितांश सवाईथुल, निलेश मेश्राम, नितीन नंदागवळी, राहुल वानखेडे आदी उपस्थित होते. मोठ्या संख्येने उपासक आणि उपासिकांनीही कार्यक्रमात सहभाग घेतला.

लोकनेते बाबुरावजी मडावी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त गडचिरोलीत २८ नोव्हेंबरला आदिवासी साहित्य संमेलन

खासदार डॉ. नामदेव किरसान यांच्या हस्ते उद्घाटन; साहित्यिक, विचारवंतांची उपस्थिती, कवी संमेलनाचेही आयोजन



दै. सिंहवाणी वृत्त, गडचिरोली

लोकनेते आदिवासी रत्न बाबुरावजी मडावी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त नवोदित आदिवासी साहित्य परिषदेच्या पाचव्या साहित्य संमेलनाचे आयोजन शनिवार, दिनांक २८ नोव्हेंबर २०२६ रोजी गडचिरोली येथे करण्यात आले आहे. अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद, नवी दिल्ली आणि क्रांतिवीर नारायणसिंग उईके विकास समिती, ब्रह्मपुरी यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक न्याय भवन, समाज कल्याण कार्यालय, एल.आय.सी. रोड, आयटीआय चौक, गडचिरोली येथे हा कार्यक्रम होणार आहे.अशी माहिती गडचिरोली येथे पत्रकार परिषदमध्ये देण्यात आली.

संमेलनानिमित्त सकाळी १० ते ११ वाजेपर्यंत आयटीआय चौक ते कार्यक्रमस्थळापर्यंत ग्रंथ दिंडी काढण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी ११ वाजता उद्घाटन सोहळा होईल. गडचिरोली-चिमूर लोकसभा क्षेत्राचे खासदार डॉ. नामदेव किरसान यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होणार असून, गडचिरोली विधानसभा क्षेत्राचे आमदार डॉ. मिलिंद नरोटे सहउद्घाटक म्हणून उपस्थित राहणार आहेत. संमेलनाध्यक्ष म्हणून पालघर जिल्ह्यातील वसई येथील ज्येष्ठ आदिवासी साहित्यिक प्रा. डॉ. सखाराम डाखोरे भूषविणार आहेत. या कार्यक्रमाला माजी मंत्री तथा गडचिरोली जिल्ह्याचे पहिले पालकमंत्री शिवाजीराव मोघे, अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद नवी दिल्लीचे राष्ट्रीय कोषाध्यक्ष दिनेश बाबुराव मडावी, तसेच समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त डॉ. सचिन मडावी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. ज्येष्ठ आदिवासी साहित्यिक कुसुमताई आलाम या बीजभाषक म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. पहिल्या सत्रात लोकनेते बाबुरावजी मडावी यांच्या सामाजिक, साहित्यिक, राजकीय व लोकउपयोगी योगदानावर विचारमंथन होणार आहे. दुसऱ्या सत्रात आदिवासींच्या मातृभाषा, मौखिक साहित्याचे संवर्धन व चिकित्सा या विषयावर साहित्यिक आणि अभ्यासक आपले विचार मांडणार आहेत.

"संविधानाचा विचार, विकसित भारताचा निर्धार! चंद्रपुरात युवा संवाद संपन्न



दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर

भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधून शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चंद्रपूर येथे 'विकसित भारत युवा संवाद - संविधान दिन विशेषांक' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र शासनाचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. मेरा युवा भारत, चंद्रपूर तथा युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम पार पडला.

या कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा युवा अधिकारी सारंग मेश्राम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी टोंगे सर होते, तर महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने वैशाली टोंगे प्रमुख व्यक्ती म्हणून उपस्थित होत्या.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवर, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले. तसेच भारतीय संविधानाने दिलेली न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्ये जपण्याची, संविधानाचा सन्मान करण्याची आणि संविधानातील तत्त्वांचे पालन करण्याची सामूहिक शपथ घेतली. संविधान दिनानिमित्त आयोजित या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये संविधानिक मूल्ये आणि नागरिकांच्या कर्तव्यांविषयी जागरूकता निर्माण करण्याचा सदेश देण्यात आला.

यावेळी मेरा युवा भारत आणि युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांच्या वतीने youth Icon म्हणून रुपेश पांडुरंग कुत्तरमारे उपस्थित होते. त्यांनी भारत सरकारच्या वतीने विकसित भारत युवा संवादासाठी तयार करण्यात आलेल्या 'विकसित भारत २०४७' या विशेष ढढळ सादरीकरणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

यावेळी त्यांनी विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी युवकांची भूमिका, भारतीय संविधानाची मूल्ये, नागरिकांची कर्तव्ये, कौशल्य विकास, सामाजिक सहभाग, रोजगाराच्या संधी आणि राष्ट्रनिर्मितीतील तरुणांचे योगदान या विविध विषयांवर मार्गदर्शन केले. विकसित भारताच्या निर्मितीत युवकांनी केवळ लाभार्थी न राहता सक्रिय भागीदार बनावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाला मेरा युवा भारत कार्यालय, चंद्रपूरचे लेखापाल संजय राऊत, मारुती बोभाटे, देवाभाऊ पाचभाई, यश आसुटकर, ढोके सर तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील सर्व शिक्षकवृंद आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. भारतीय संविधानाबद्दल जागरूकता निर्माण करणे, युवकांमध्ये लोकशाही मूल्यांची रुजवण करणे आणि विकसित भारत २०४७ च्या संकल्पनेशी तरुणांना जोडणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. संविधानिक मूल्यांचा अंगीकार करून राष्ट्रनिर्मितीत योगदान देण्याचा संदेश देणाऱ्या या कार्यक्रमाची सांगता सामूहिक राष्ट्रगीताने करण्यात आली.

जिल्हा परिषद हिंदी वरिष्ठ प्राथमिक शाळा नवेगाव येथे साजरा झाला संविधान दिन



दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा

जिल्हा परिषद हिंदी वरिष्ठ प्राथमिक शाळा नवेगाव येथे संविधान दिन उत्साहपूर्ण आणि प्रसन्न वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक एस.एम. दसरिया होते. कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादनाने करण्यात आली. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून पदवीधर शिक्षक एस.जी. मच्छिरके, आर.एस. बसोने, सहाय्यक शिक्षक योगेश चंदनकर, स्वयंसेवक राकेश दमाहे तसेच स्वयंसेविका साक्षी भंडारी उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना संविधान निर्मितीचा इतिहास, संविधानाची वैशिष्ट्ये, नागरिकांचे मूलभूत अधिकार व कर्तव्ये तसेच लोकशाही मूल्यांचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी वक्त्यांनी सांगितले की, भारतीय संविधान प्रत्येक नागरिकाला समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुतेचा संदेश देते. संविधानातील आदर्श आपल्या जीवनात आचरणात आणणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. कार्यक्रमाचे संचालन पदवीधर शिक्षक राजकुमार बसोने यांनी केले, तर आभार प्रदर्शन सहाय्यक शिक्षक योगेश चंदनकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विद्यार्थी सुजल दमाहे, आर्यन बोपचे, हिमांशू लिल्हारे, माही बोपचे, इजल ताडेकर, दिव्या दमाहे आणि विधी बोपचे यांनी विशेष परिश्रम घेतले.

उखर्डा रस्त्याच्या डांबरीकरणासाठी पुकारलेले आमरण उपोषण प्रशासनाने दडपले

'कायदा व सुव्यवस्थे'चे कारण पुढे करत तहसीलदार व पोलिसांकडून परवानगी नामंजूर, मग गेल्या ६ वर्षांपासून या रस्त्यावरून जीव मुठीत धरून प्रवास करणाऱ्या जनतेचे काय?, सामाजिक कार्यकर्ते अभिजित कुडे यांचा प्रशासनाला रोखठोक सवाल

दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा

वरोरा तालुक्यातील मौजा उखर्डा येथील रस्त्याच्या डांबरीकरणाच्या प्रलंबित मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते अभिजित प्रभाकरराव कुडे यांनी २६ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी १२ वाजतापासून हनुमान मंदिर, उखर्डा येथे आमरण उपोषण पुकारले होते. मात्र, वरोरा तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी आणि वरोरा पोलीस स्टेशनने 'सार्वजनिक रहदारीस अडथळा व कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न' निर्माण होण्याची शक्यता वर्तवत या उपोषणाची परवानगी नामंजूर केली आहे.

यासोबतच पोलिसांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १६८ अन्वये नोटीस बजावून कायदेशीर कारवाईचा इशारा दिला आहे. प्रशासनाच्या या भूमिकेमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

प्रशासनाची भूमिका नेमकी काय ?

अभिजित कुडे यांनी १८ नोव्हेंबर २०२६ रोजी तहसील कार्यालय व पोलीस प्रशासनाकडे उपोषणाच्या परवानगीसाठी अर्ज सादर केला होता. यावर २३ नोव्हेंबर २०२६ रोजी वरोरा तहसीलदार व तालुका दंडाधिकाऱ्यांनी लेखी पत्राद्वारे उपोषणाची परवानगी नाकारली. तर दुसरीकडे, वरोरा पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षकांनीही कलम १६८ अन्वये नोटीस देत, "परवानगीशिवाय उपोषण करून शांतता व सुव्यवस्थेला बाधा आणल्यास न्यायालयात पुरावा म्हणून ही नोटीस सादर करून कायदेशीर कारवाई केली जाईल," असा इशारा दिला आहे. सोबतच, आपले म्हणणे रीतसर शासनाशी पत्रव्यवहार करून मांडावे, असा सल्ला पोलिसांनी दिला आहे. अभिजित कुडे यांचा प्रशासनाला थेट सवाल: "जनतेने नेमका कोणत्या मार्गाने न्याय मागायचा?" प्रशासनाच्या या निर्णयावर सामाजिक कार्यकर्ते अभिजित प्रभाकरराव कुडे यांनी तीव्र शब्दांत संताप व्यक्त करत काही रोखठोक प्रश्न उपस्थित केले आहेत.



त्याचे काय ?

निवेदने आणि आंदोलने करूनही ढिम्म प्रशासनः पोलिसांनी रीतसर पत्रव्यवहार करण्याचा सल्ला दिला आहे; पण या रस्त्यासाठी यापूर्वी अनेकदा निवेदने दिली गेली, शांततापूर्ण आंदोलने झाली. तरीही प्रशासनाला जाग आली नाही. न्याय मिळवण्याचा मार्ग कोणता? शांततापूर्ण मार्गाने उपोषण करायचे म्हटले तर 'कायदा व सुव्यवस्थे'चे कारण दाखवून नोटीस बजावली जाते आणि परवानगी नाकारली जाते. मग सामान्य नागरिकाने आपल्या हक्काच्या रस्त्यासाठी नेमका कोणत्या मार्गाने न्याय मिळवायचा?

एकीकडे ६ वर्षांपासून रस्त्याचे काम रखडलेले असताना, दुसरीकडे न्याय मागणाऱ्या कार्यकर्त्यालाच कायद्याचा धाक दाखवला जात असल्याने वरोरा तालुक्यात प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर तीव्र प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.